म. ग्रं सं ठाणें.
विषय नाट्य
सं. क्र. २४३७

# तुही यत्ता कंची

नामदेव लक्ष्मण ढसाळ

तुही यत्ता कंची
नामदेव लक्ष्मण ढसाळ

तुही यत्ता कंची
तुही यत्ता

REFBK-0023402

तुही यत्ता कंची
नामदेव लक्ष्मण ढसाळ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४३६

साच पुण्याला शाम्याकडे गेलो होतो / ग्वाल्हेरला तू यायला हव
र व दया पवार एवढेच / बाकी तू + राजा + दिलीप + सतीश नव्हता
र चांगले लोक होते / मी व शेखरनं पेपर्स वाचले, दिलीपचा त्याच्या
लोक खूप व्यवस्थित चर्चा करीत / दोन्ही दिवस मिळून मी
अनुवाद मी केले होते ते वाचले / तुझ्या ६ कवितांचे अनुवाद
ववच्या कवितांनाच हिंदी साहित्यिकांनी प्रचंड डोक्यावर घेतलं
रिक्त तुझ्या आणखी कविता मला वाचायला लावल्या / मी 'गोल
र व नंतर तात्काळ हिंदीत अनुवादून वाचल्या / instant
Seminar अर नामदेव, ढसाळच (आत्मस्तुतीचा दोष पत्करूनही
वाटा होताच !) या सेमिनारमुळे एकदमच National event

साक्षात्कार' या हिंदी मासिकास तुझ्या ४० कविता आणि
त हिंदी अनुवाद कवितांचे / ते तुला भक्कम पैसे देतील /
उर्दू, असमी इत्यादी अनुवादही मी करून घेतोय / म्हणजे

हे असे मी गृहित धरतोय / दुसरं : 'मराठी दलित
ो आहे हिंदीत / त्यासाठीही तुझी व मल्लिका
ल्लिकाच्या अलिकडच्या काही ३-४ कविता पाठव /

२९/२ | औरंगाबाद : 431.001



नाम्या, आज सकाळीच आलो / ग्वा
होतंस / तिथं मराठीतले मी, चंद्रशेखर
हा सेमिनार फारच चांगला झाला / हि
अनुपस्थितीत वाचला गेला / प्रचंड चर्चा
१२-१३ कवींच्या सुमारे ५० कवितांचे
केले होते / एकूण फक्त तुझ्या व
त्यातही पुन्हा खास तुझ्याच / ६ का
पिठा'तून ५-६ आणखी कविता आ
Translations / हिंदीवाले प्रचंड खु
अर्थात ह्यात माझ्या वाचण्याच्या पद्धतीचाही
म्हणून लोकांना तुझ्याचं interest
मध्यप्रदेश शासनाच्या साहित्य परिषदे
एक परिचयात्मक नोट मी छापतो
नंतर या हिंदी अनुवादांवरून
तसं लोकांनी मला विचारलंय

या सर्व गोष्टींना तुझी परवा
कविता' नावाचं संकलनही मी
अमरशेखची परवानगी कळ
एवढंच तूर्त लिही !

चंद्रकान्त पाटील 1/2

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४३८


...सारखं पुण्याला शाम्याकडे गेलो होतो / ग्वाल्हेरला तू यायला हवं
...ार व दया पवार एवढेच / बाकी तू + राजा + दिलीप + सतीश नव्हता /
...र चांगले लोक होते / मी व शेखरनं पेपर्स वाचले, दिलीपचा त्याच्या
लोक खूप व्यवस्थित चर्चा करीत / दोन्ही दिवस मिळून मी
अनुवाद मी केले होते ते वाचले / तुझ्या ६ कवितांचे अनुवाद
...सर्वच्या कवितांनाच हिंदी साहित्यिकांनी प्रचंड डोक्यावर घेतलं /
...रिल तुझ्या आणखी कविता मला वाचायला लावल्या / मी 'गोल-
...ा व नंतर तात्काळ हिंदीत अनुवादून वाचल्या / instant
Seminar अर नामदेव, ढसाळच (आत्मस्तुतीचा दोष पत्करूनही
वाटा होताच!) या सेमिनारमुळे एकदमच National event

साक्षात्कार' या हिंदी मासिकात तुझ्या ६० कविता आणि
...त हिंदी अनुवाद कवितांचे / ते तुला भक्कम पैसे देतील /
उर्दू, असमी इत्यादी अनुवादही मी करून घेतोय / म्हणजे

...हि असे मी गृहित धरतोय / दुसरं: 'मराठी दलित
...ी आहे हिंदीत / त्यासाठीही तुझी व मल्लिका
मल्लिकाच्या अलिकडच्या काही ३-४ कविता पाठव /

२९८१ || औरंगाबाद : 431.001

# तुही इयत्ता कंची
# तुही इयत्ता



नामदेव लक्ष्मण ढसाळ

आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई

© मल्लिका अमरशेख १९८१

प्रकाशक: गोविंदराव आविक, अध्यक्ष, आंबेडकर प्रबोधिनी,
९८, हाजी कासम चाळ, शाहीर अमर शेख मार्ग, संत गाडगे महाराज चौक,
मुंबई ४०० ०११
सहाय्यक: जयदेव गायकवाड

किंमत वीस रुपये

मुद्रक: अरूण नाईक, अक्षर प्रतिरूप, ४२ आंबेकर मार्ग, मुंबई ४०० ०३१

छाया जुळणी: शारिवा, देवनागरी, १२ पॉ. मध्यम

मुखपृष्ठ, कविताचित्रं : अरूण कालवणकर

मोहन वेल्हाळ आणि राजा ढाले यांनी मुद्रितं तपासली.

संदर्भ काव्य
२०३७
२३००२
९५।१।८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

28 FEB 1982

20 MAR 1982

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

नामदेव ढसाळ यांचं इतर साहित्य

कविता संग्रह

गोलपिठा


मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले

आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र: प्रियदर्शनी


कादंबरी

हाडकी हाडवळा

निगेटिव्ह स्पेस (आगामी)



# अनुक्रमणिका




| | |
|---|---|
| छबुकलं दारिद्र्य | १ |
| अल्पायुषी चंद्रप्रकाश | २ |
| सैनानाबद्दल | ३ |
| अजून थोडावेळ | ५ |
| पतंगाबद्दल | ६ |
| लंगर | ७ |
| ल्हानुल्याची प्रार्थना | ८ |
| भर | ९ |
| आरश्याबद्दल | १० |
| ज्वर | ११ |
| आयना | १२ |
| म्हशी | १३ |
| कविता | १४ |
| माझी मऊमोर स्वच्छ पिसे | १५ |
| मादरी जुबान | १६ |
| हे कत्तलखोर | १७ |
| क्षुद्र गोष्ट | १८ |
| कसा विहरू | १९ |
| वारलेल्या माणसाची गोष्ट | २० |
| भाड | २२ |

कुरणे २३

असेंब्ली / वऱ्हाडी ढंगाचे पावसाळी अधीवेशन २५

पावसाचे गाणे २६

तुम्ही २७

आठवण २९

खळाळ पाण्यात ३०

निळू फुले / एक निमित्त वरपांगी ३२

त्यांनी ईश्वराला हाकारले ३५

गुलाबी आयाळीचा घोडा ३९

दंगल ४१

मावळतीचे गाणे ४३

जनरल वार्ड ४४

गोची ४६

मेंदूच आपल्या ४८

माझ्या दफनविधीची गोष्ट ५०

पाचागणी ५२

सुजनखोर जर्दाळू ५३

कामाठीपुरा ५५

पिलाहाऊसचा मृत्यू ५७

संत फॉकलंड रोड ६२

मौलाना मेंडीबाजार ६६

प्रियंकर ६८

मूक ६९

स्वातंत्र्या ७४

तुही इयत्ता कंची ७७

आंबेडकर १९७८ ७९

आंबेडकर १९७९ ८५

आंबेडकर ८० ८७

आंबेडकर ८१ ९०

रमाबाई आंबेडकर ९२




मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
27834
23802
क्रमांक
१५१११२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# मला असं म्हणायचं आहे -

सामजिक बांधिलकीचा स्वीकार करणारे कतीशील व्यक्तिमत्व व त्याचे लेखन यांचा मोकळेपणानं आस्वाद घेणे मराठी समीक्षेला अजून शक्य झाले नाही. अशा व्यक्तीच्या कृतींचा, समूहमाध्यमातून जाणवणाऱ्या बऱ्यावाईट घटितांचा व त्याच्यातील सूक्ष्मसंवेदक कलावंताचा विचित्र संकर झालेला असतो.

श्री. नामदेव ढसाळ यांच्या 'गोल पिठा' संग्रहाने मराठी कवितेला एक अस्पर्श-अनोखे क्षितीज सर्वार्थाने खुले करुन दिले. सांकेतिक शब्दसारणीचे सर्व सांचे तोडून मोडून टाकले. ह्या दशकातील ताकतीचा जो अनुलंघ्य मानदंड होता. इतका की ढसाळांनाही त्यापुढे जाणे शक्य झाले नाही. त्यामुळेच 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' आणि 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी' ह्या दोन पुस्तकांकडे फारसे चोखंदळ व चिकित्सक दृष्टीने पाहिले गेले नाही.

एक गोष्ट स्पष्ट आहे की, विवक्षित सामाजिक तत्त्वज्ञानाच्या पुरस्काराचा इतका ठळक गंडा बांधून वावरणे, मराठी काव्यरसिकाला त्याज्य वाटते. पण कलादृष्टीने ते सारे काव्यच, तिरस्काराचा टिळा लावून, टाकावू ठरवून, निकालात काढणेही त्याज्यच ठरावे.

'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' हा श्री. नामदेव ढसाळ यांचा नवा चवथा काव्यसंग्रह. एकावन्न कवितांच्या ह्या संग्रहात ढसाळांच्या सर्वगामी प्रवासाचे विविध समृद्ध रंग प्रकट झाले आहेत. स्वत:च्या अनोख्या ढंगाने आणि शैलीने उपरोक्त संग्रह, संस्मरणीय असाच झाला आहे.

श्री नामदेव ढसाळ हे सामाजिक प्रश्नावर ज्या पोटतिडीकेने आक्रमकपणे पेटून उठतात त्याच्या अगदी उलट टोकाला जाऊन, हळुवारपणे मानवी मनःकोशातील भावनांची जपणूकही करतात. शब्दांच्या कठोर लाठ्याकाठ्यांनी अन्याय करणाऱ्या घटकांवर तुटून पडतात. तसेच अंतर्मुख होऊन दुःख कारणांचा बुद्धाच्या करुणेने शोध घेऊन, विधायक आशावादालाही पेरीत जातात.

ह्या संग्रहातील त्यांचे चिंतनविषय सर्वसमावेशक आहेत. स्वतःचे चित्रविचित्र विसंगत वागणे, आपल्या व आपल्या समाजावर लादल्या गेलेल्या सर्वांगीण गुलामी ओझ्याचे आदिकारण शोधणे, जग, माणसांची अतर्क्य मैफल, माणूस व त्यांचे चिरंतन विकारचक्र, शिव्याशाप आणि परवड, ऋतुचक्रांची पतझड, स्वातंत्र्य, मानवी मनाला पडणारे मुक्ततेचे संगमरवरी स्वप्न, त्यांच्या कस्पटामागच्या चिरडल्या जाणाऱ्या पण पुनःपुन्हा सजग होणाऱ्या भावना, एक दुसऱ्याशी, विचारसंसारातील गुंतागुंतीची नाती, 'छबुकल्या दारिद्र्यांची विरूपे आणि शरीर वासनांची व पोटाच्या कुरतडणाऱ्या भुकेची लळिते, ढसाळांना सैरभैर करून सोडतात. मग पुराने फुंफाटलेली गढूळगाळ नदी वेगाआवेगाने गेरावत निघावी, असे शब्द त्यांना सुचतात. त्यांना वेग असतो बंदुकीच्या गोळीचा. त्यांची धार असते खंजिरासारखी तीक्ष्ण. पण हे सगळे घडत असतानाही ढसाळ वैचरिकतेच्या व भावनात्मकतेच्या किनाऱ्यांचे भान ठेवून असतात. आणि हेच त्यांच्यातील कवीचे मोठेपण आहे. कारण कार्यकर्त्यांवर मात करून, शब्दातला प्रचारगंज घासूनपुसून तो लख्ख निरामय करण्याचे काम, त्यांच्यातील कवी पार पाडीत असतो.

शब्द ही नामदेव ढसाळांच्या मनातील उसळती लाट आहे शब्दांच्या विविध विभ्रमांचा केशवसुतांपेक्षाही अधिक सुजाणपणे व धिटाईने त्यांनी विचार केला आहे. आपल्या प्रत्येक अनुभवात व पडझडीतही शब्दांची सोबत त्यांना प्रिय आहे. रक्त आणि दारूपेक्षाही. आपल्या सोबतच शब्दांना ते जनरल वॉर्डात विश्रांतीला बोलावतात –

'हे शब्दांनो याना इथे विश्रांतीला
पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत
जग याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्याना

जरा याही वमणीचा गिदम गेकून घ्याना

जरा याही पुत्रवनी वृक्षाच्या छायेत बसून घ्याना

कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल.' (जनरल वॉर्ड)

आतापर्यंतचे शब्द स्पेशल वॉर्डातले होते. वेद उपनिषदे, संतमहंतांनी व पोटभरु पंडितांनी त्यांची नसबंदी केली होती. माणुसकीचा, भूतमात्रांचा कोरडा गहिवर, त्यांना मढवला होता. त्यामुळे ते गावाबाहेरच्या गर्दीकडे व गावकुसाबाहेरच्या तृष्णार्तांकडे वळलेच नाहीत.

ही जाणीव ढसाळांना पोखरून काढते. सतत तळपत्या उन्हात पोळत्या अनवाणी पायांची आपली बापुडवाणी माणसे बघताना, त्यांच्या मनाची तगमग होते. आणि ते लिहितात –

'शब्दांनी हरवून जायला हवंय

फक्त वेड्यांच्या जत्रेत

वेड्यांच्या

हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस.'

(या अखंड ग्रीष्मात)

प्रत्येक दिवस साधा असो, रजेचा असो की स्वातंत्र्याचा असो, तो घेऊन येतो येतो अपेक्षाभंगाचा कडकडीत उन्हाळा. अशा आयुष्याच्या निरर्थक चौकटीला तरी अर्थ काय? म्हणून 'मौलाना भेंडीबाजार' या कवितेत ते म्हणतात–

'उगाच कशाला हवाय नुस्ताच शब्दांचा पाऊस

आयुष्याचे दरवाजे मोडत जाणारा'.

शब्दांच्या विविधांगी शक्तीक्षमतेचा ढसाळ सतत वेध घेत आहेत, असे त्यांच्या कवितांतून जाणवत रहाते.

हे दुनियेचे अंतरंग

हे दुनियेचे अंतर्विरोध हा धुमसणारा गदारोळ

ही निर्वस्त्र सोलून पडलेली अगनिक आयुष्ये

हे भारद्वाज महाकाव्यानंतरचे

हे रक्तवृक्ष थिजून गेलेले...

(मेंदूच आपल्या)

शब्दांची अशी अनेकपदरी झुंबड, कवीला अस्वस्थ करते. माणसांच्या

खचाखच अगनिक गर्दीची 'दंगल' त्यांना वाटते –
'दंगल एक दर्दभरी कविता ऐकवून जाते माणसाला
आपण टाळया वाजवा
आणि म्हणा वन्समोअर / वन्समोअर'.

शब्द आणि कविता याबद्दलची नामदेव ढसाळांची मनोगते खूप बोलकी, व्यापक व आशयसंपन्न अशीच आहेत. 'कविता' नावाच्या छोट्या कवितेत त्यांना कवितेचा रंग म्हणजे –

'मरणावर चढणारा
चतुरंग'.

वाटतो. अजून मराठीची ओटी भरली गेलीच नाही, अशी त्यांची धारणा आहे. म्हणून तर ते म्हणतात –

'हे बहिणाबाईच्या बहिणाबाई
मरण्यापूर्वी एकदा तरी तुझे
गाणे ऐकवशील काय?
या रांडाव मराठी भाषेला
पुन्हा सवाष्ण होताना पहायच मला.'

(रमाबाई आंबेडकर)

भाषा सवाष्ण-समृद्ध व्हायची असेल, तर ती बोलणाऱ्या दीन दलितांच्या जीवनमानात प्रगतीपर परिवर्तन घडले पाहिजे. पण त्यांची अवस्था अधिकच विकट व त्रिशंकूसारखी झाली आहे. म्हणूनच नामदेव ढसाळ 'कसा विहरू मध्ये–

धड पहाटेचा उदय होत नाही
धड पाखरे निवांत झोपी जात नाहीत
कंच्या शहाण्यांनी लिहून ठेवलीय
ही लोफर मेलडी.

शब्दांचे हे निरर्थकत्व, आपल्यासाठी व आपल्या आप्तेष्टांसाठी अनुभवल्यामुळे ढसाळ क्रुद्धविद्ध होतात. त्यांच्यातला गर्दीत वावरणारा कार्यकर्ता व कार्यकर्त्यांच्या मनात राहणारा कलावंत यांच्यात रस्सिखेच सुरु होते आणि त्याच द्वंद्वातून –

'या एकाकीपणाच्या अंगाईसाठी
कुठले शब्द वापरू
कुठले शब्द.' (लंगर)

असा प्रश्न त्यांच्या मनात उद्‌भवतो. आपल्यासमवेत अनेकांच्या स्वप्नांच्या जखमा सांभाळीत चंद्रप्रकाश प्राणात पेरून या कवीची ही मनस्वी वाटचाल चाललेली दिसते. ही शब्दलाट अशा अनेक रीतीने त्यांच्या मनाच्या कातळाला या संग्रहात धडका देताना दिसते.

प्रापंचिक कुटुंबवत्सल माणूस आणि न्यायासाठी उपलब्ध असलेल्या शक्तिसाधनांनी लढा उभारणाऱ्या पँथरमध्ये वावरणारा नेता ह्या दोन रूपांची ओढाताण त्यांच्या आरंभीच्या कवितात दिसते. 'छबुकलं दारिद्र्य' खेळवतांना पितृह्रदय व मातृवात्सल्याचा समन्वय त्यांच्यात झालेला दिसतो. दोन्ही पातळ्यांवर ही कविता मनाला भिडत जाते. स्वतःच्या अपत्याकडे पाहाणारा पिता आणि यातनेलाच अर्भकाचे प्रतिक मानून केलेली जोजवणूक या कवितेत दिसते.

'नेत्राचा दिवा हाताचा पाळणा करता आला नाही तुम्हाला
तरी म्हणा ना तुम्ही
पड्ड झड्ड माल वाढ्ढ...
किंवा- बाळाला जपून उचला भाववंदानो
ते अंगावर सु करील बरं का
आपल्या यातनांचं छबुकलं दारिद्र्य.

'ल्हानुल्याची प्रार्थना' या कवितेतही त्यांच्यातील समजुतदार वात्सल्याचा प्रत्यय येतो.

'अल्पायुषी चंद्रप्रकाश,' 'सैतानाबद्दल,' 'अजून थोडावेळ,' आठवण, मावळतीचे गाणे, ज्वर, आरश्याबद्दल 'लंगर,' आणि 'आयना' य कवितांतून नामदेव ढसाळांचे एक अनोखे ऋजु रूप आठवते.

सतत गर्दीच्या जल्लोषात आणि माणसांच्या गोंगाटात वावरणाऱ्या ढसाळांच्या अंतरंगातील एक कोपरा किती हळवा, तरल आणि एकाकी आहे याचे प्रत्यंर त्यांच्या, 'गोची', 'जनरल वॉर्ड', 'दंगल', 'मेंदूच आपल्या', 'सुजनखोर जर्दाळू', 'पाचगणी', 'माझ्या दफनविधीची गोष्ट', या कवितांतून येते.

हॉस्पिटलच्या खाटेवर जवळजवळ अज्ञात मृत्यूप्रदेशातून फेरफटका मारून आलेल्या त्यांच्या मनातले सर्व रंगतरंग या कवितात उमटले आहेत.

'ह्या कपड्यात फारच

चोरामारखे वाटते. हा 'पाचागणी' या

कवितेचा आरंभच त्यांच्या मनोवेदनेचे ओळख पटवतो. तर 'माझ्या दफनविधीची गोष्ट, या कवितेचा समारोप–

'फक्त आठवणीत राहील

तुमच्या मैलामैलाच्या दगडावर

मुतत जाणारे

एक गावठी कुत्रे.' ह्या ओळीनील अलिप्त अशा आविष्करणामुळे अविस्मरणीय ठरला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा नामदेव ढसाळ यांचा मूळ शक्तिस्त्रोत आहे. ह्या केंद्रमाध्यमातूनच त्यांच्या लढ्यासाठी त्यांनी स्फूर्ति, हुरूप आणि हिंमत घेतली आहे. व्यवहारात आणि जीवनकलहात माणूस म्हणून काही स्वाभाविक तडजोडी त्यांनी केल्या असतील. पण राजकीय जीवनाचे तेही एक महत्वाचे अविभाज्य अंग असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर कविता होणे हा त्या त्या वर्षाचा एक संकेत त्यांनी मानला आहे. आंबेडकर १९७८, १९७९, १९८० आणि आंबेडकर १९८१ या कविता व 'रमाबाई आंबेडकर' ही कविता या दृष्टिकोणातून वाचली तर ढसाळांच्या वैचारिक बांधिलकीचे स्वरूप खूप स्पष्टपणे ध्यानात येते. आंबेडकर १९७८ या कवितेचा आरंभ आणि अंत इंग्रजी कॅपिटल अक्षरांनी त्यांनी केला आहे.

'EQUALITY FOR ALL

OR

DEATH FOR ALL'

कारण हे जागतिक विश्वमान्य बुद्धाच्या आर्यसत्याइतकेच त्यांना ठासून मांडायचे आहे.

'हा देश नुसताच

गेंड्यासारखा वाढत राहिला

त्याच्या फालतू विद्रूप पानावर

आपण अकारण लट्टू झालो.' हे उमगल्यामुळे
डॉ आंबेडकरांशी संवाद साधताना ढसाळ सहजपणे लिहून जातात
'दहशतीपेक्षा तुझा विश्वास होता जागृतीवर
तुझी जागृतीचा आधार होता अभ्यास-सेवा'
'इश्वराची तू केलीस शवचिकित्सा
सटवीचं कापलस नाक
केलेस नकट..
आणि काहीही दुर्बोध यापुढे न लिहिना पुन्हा आरंभीच्या इंग्रजी ओळींची सार्थ पुनरूक्ती करून ही कविता संपते.

आपला, आपल्या, चळवळया लोकांचा निग्रह पूर्वक शोध घेणे हे ढसाळांच्या चिंतनानेच एक अंग आहे. 'त्यानी वरून पाणी वाढलं, पडवीबाहेर बसवलं, विठोबाच्या दर्शनाला वंचित केलं, हे सगळ जुनं झालं आहे. नव आहे ते इतकच की,
'ज़माना सर्व तुझाच आहे
तरीही तुझे लोक दुःखी आहेत.
फकीराला पंतप्रधान होता येतं इथं
परंतु मांगा भंग्याला नाही.' [ आंबेडकर - ८०]
कंठाला लंगोटया बांधून डिंग्या मारणाऱ्या संधीसाधू अनुयायांना-आपल्याच स्वबांधवांना ते कठोरपणाने फटकारतात. देशाच्या सध्याच्या स्थितीचे विदारक दर्शनही घडवितात.
'हा भाकरीचा ज़ाहिरनामा
हा संसदेचा रंडीखाना
ही देश नावाची आई
राजरोस निजते कुबेराच्या
सोबत काळ होत चालला आहे
कर्मठ...[ आंबेडकर -७९]
आंबेडकर ८१' हया कवितेत त्यांनी एक दुर्दम्य विश्वास व्यक्त केला आहे.
'स्वप्नांचे पडदे टरकावून सिंहनादात सामिल व्हायला
सज्ज आम्ही / आता भीती कोणाच्या बापाची ?'

'रमाबाई आंबेडकर' ही तर सर्वांची आई. तिचे स्मरण व शब्दचित्र ढसाळांनी अतिशय मनःपूर्वकतेने रेखाटले आहे.

अष्टोप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे!
सवतीमत्सर तुला करताच आला नाही का ग?

किंवा....'डबकं चाळीतल्या राजहंसाना
दगडी कोळश्यांच्या धुराची
तू लागू दिली नाहीस झळ

तुझ्या मुक्यामनाची गाणी
कल्कीचा घोडा ह्या कलयुगात घेऊन फिरतो आहे
मराठी भाषेची ऐसीतैसी करत.'

आणि ह्या अशा आत्मिय भावातूनच, आत्यंतिक सलगीतूनच त्यांच्या भाषेला पडणारे पिळे आणि पैलू दृगोचर होतात. दर्शनी कधीकधी ते अस्वस्थ करतात. अप्रस्तुत वाटणारे लिहिल्याचा भास निर्माण करतात.

'कामाठीपुरा', पिला हाऊसचा मृत्यू, संत फॉकलंड रोड व 'मौलाना भेंडीबाजार' ह्या चार कविता या संग्रहातील उत्कट व उत्कृष्ट कविता म्हणून नमूद करता येतील. ज्या अमानुष व अपमानुषी परिसरात नामदेव ढसाळांनी आपले आयुष्य घालविले. वडीलांचा खाटिकाचा व्यवसाय असल्यामुळे खाण्यापिण्याच्या रंगाढंगात बुडालेल्या अनेक छंदीफंदी माणसांचा त्यांच्या रागालोभाचा, उद्रेक-उत्स्फोटाचा ढसाळांना उपजतच संस्कार घडत गेला.

मुंबईतल्या ह्या बदनाम वस्त्या. संस्कृतीच्या दिवाळखोरीच्या वाहत्या जखमा. माणुसकीला व स्त्रीत्वाला डागणारा चरचरीत चटका. तसे ह्या वस्त्यांचे व विषयांचे सुतोवाच 'गोलपिठा' मध्येही आहे. पण येथे ढसाळांनी काव्यात्मक उंची गाठली आहे ह्या वस्त्यात कधीच व काहीच सुरक्षित नसलेल्यांनी फेकूनझोकून दिलेल्या आयुष्याच्या कवड्यारेवड्यांचा- घामरेत रक्ताचा चोवीस तास मन्नाट जुगार चाललेला. असतो. 'कामाठीपुरा' एखाद्या चित्रकाराच्या सृजनात्मक कौशल्याने ढसाळ उभा करतात तो असा-

'कॅलेंडरला हेपलून
कित्येक शतकांचा उपदंश देहावर मढवून

निशाचर सळिंदर पहुडलय इथे.'

जीवनाचे बेरंग कवीची जीभ कडूजहर करतात. कोणत्याही-कसल्याही विषाची चव घेण्यासाठी रांगा लावणारे येथले खप्पड स्त्रीपुरुष कवीला क्लान्त करतात.

'शब्दांसारखे इथे मरण देखील आले आहे भरून

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

19 MAR 1986

19 MAR 1986

16 APR 1986

( क्रु. मा. प. )

५०००-४-८०

निशाचर सळिंदर पहुडलय इथे '

जीवनाचे बेरंग कवीची जीभ कड्रजहर करतात. कोणत्याही-कसल्याही विषाची चव घेण्यासाठी रांगा लावणारे येथले खप्पड स्त्रीपुरुष कवीला क्लान्त करतात.

'शब्दांसारखे इथे मरण देखील आले आहे भरून

बस्स थोड्या वेळात इथे सरी कोसळू लागतील.' आणि अशा कामाठीपुऱ्याची ' चिखलातलं कमळ' होण्याची कवी आसूसून वाट बघतो आहे. 'पिलाहाऊस' ढसाळांना आपल्यासारख्या अनेकांच्या व्यक्तिमत्वाचाच एक अविभाज्य भाग वाटतो.

'आजपर्यंत आमच्या सारखाच जगलास तू तिसरा चौथा दर्जा' 'भेंडीबाजार' आणि फॉकलंड रोड' ह्या कवितांना त्यांनी लावलेल्या 'मौलाना' व 'संत' ह्या उपाध्या, तुकारामाचा आणि नेकरहिम अल्लाचा संदर्भ अशा दुहेरीतिहेरी अर्थवलयातून त्यातला विखार व उपरोध उकळणाऱ्या लोखंडाच्या रसासारखा ढसाळांनी शब्दबद्ध केला आहे.. त्यातला आवेग व त्वेष इतका आहे. की शब्दाआधी अर्थ हत्पटलावर दाणकन आदळतो. सुन्न करून सोडतो. मर्ढेकरांच्या कवितेतील उपऱ्या सहनुभुतीचे किंवा नारायण सुर्वे यांच्या 'पाणी घे'-मधल्या टिचकी मारणाऱ्या सावध भावनेचे कुंपन ढसाळ आपल्या स्वयंसिद्ध सामर्थ्याने लीलया ओलांडतात. नुस्ते त्या वस्तीत ते रसिकाला नेत नाहीत तर साऱ्याच शिड्यापायऱ्या उतरवून तळागाळाच्या तळघरात नेऊन सोडतात. मधाचे पोळे फुटावे असे रंगबेरंग टिपणारे त्यांचे शब्द टपटपतात.

'दंगल' ही एक प्रत्ययकारी कविता. प्रत्यक्ष चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्याला आकस्मिकपणे कोणत्या आक्रिताला सामोरे जावे लागेल त्याचा नेम नसतो. लहानशा प्रतिकात्मक निषेध मोर्चातून उसळते प्रचंड दंगल. पण ही अंतर्मुख करते. खूप खूप काही शिकवून जाते शिकण्याची इच्छा असलेल्या सहानुकंपी माणसाला.

स्वातंत्र्य आणि मुक्तीची उन्मुक्त स्तोत्रे आपल्या स्वःच्या ढंगाने ढसाळानी गायिली आहेत. तुकारामापेक्षाही कितीतरी पटीच्या आवेशाने, ते स्वातंत्र्याला बजावतात.

'किती ठेवावा तुझ्या

इब्लीस सर्जनावर विश्वास

आम्ही जंगली माणसं
दगडानं बोचा पुसतो नि दगड फेकून देतो
या नागरी संस्कृतीत
त्यांनी खुशाल फासारसा तुला शेंदूर
चढवून घ्यावं त्यांच्या लेकीबाळींनी तुला उरावर
खरच रे आता आम्ही फार थकलोत.'

पण याही अपंग अवस्थेत 'इराखत' करण्याची, शस्त्रक्रिया उरकण्याची व नियोगाची एकच संधी मागण्याची, अदम्य आकांक्षा ते मुखरीत करतात.

'गुलाबी आयाळीचा घोडा' म्हणजे स्वातंत्र्य. 'ते छान असतं समुद्रासारखं.

'यांच्या चौफेर वावरानं फुलात भरतो प्राण
दुःखी आयुष्यात वारा वाजवतो बासरी
मौसमाचा होऊन जातो मोर
आणि अश्रूंचे मोती.' एका आत्मविभोर

नंदीन श्री. नामदेव ढसाळ स्वातंत्र्याचे उन्मुख गीत गातात. 'तुम्ही' या कवितेमध्येही असाच सळसळता सर्पोद्दाम आवेग आहे. वस्तुतः सर्जनशीलता, समानता, संवेदकता, समजुनदारपणा व सच्चाई ही स्वातंत्र्याची अपेक्षित अपत्ये. पण ढसाळ दलित जीवनाला आलेल्या उलट्या अनुभवांचे चित्रांकरण करतात. आणि तार स्वरात पण आत्मविश्वासाने इशारा देतात.

'तुमच्या पुराकथांच्या बाजिंद्या कोकशास्त्राची
आम्हाला किळस यायला लागलीय पुन्हापुन्हा!

ढसाळांच्यातील कलावंत, हा शंभर नंबरी कसदार आहे. त्वेष, उपरोध, अगतिकता, पिसाटपणा, आक्रमकता, वात्सल्य, अलवारपणा, दैन्य, दारिद्र्य, पिचलेपण व आकांक्षा या सगळ्यांचे रसायण, त्याच्यात एकरसले आहे. त्यामुळे त्यांच्या शब्दांना सुभाषितांचे सहजरूपही लाभलेले दिसते. वानगीदाखल–

मरणापूर्वी माणूस असतो खरा
बाकी नुसती धूळ आणि धुराळा

किंवा

'आयुष्य नाही हे वांग्याचे भरीत

कोण असे आहेत ते त्यांची वस्त्रे दारिद्र्याच्या घामाने भिजली नाहीत. ह्या ओळी पाहता येतील.. 'मादरी जुबान' कत्तलखोर, क्षुद्र गोष्ट, व 'कमा विहरू', या कवितांतील उपरोध जातिवंत आहे. 'कुरणं', म्हशी, घामाचे गाणे, निळे फुले.. या कवितांतील लोकगीतांची लय, उखाण्यांचा बाज आणि शब्दविशिष्टत्व लक्षणीय आहे.

यम-यमीच्या कथेचा ते सहज उल्लेख करतात. चल गं भोपळ्या, येग गाई गोठ्यामंदी, थुई थुई नाच माझ्या अंगणात मोरा, सुमरीण बाय तुझी पाठण मऊ, मुंबई नगरी बडी बाका, पैल तो गे काऊ..., खळ्यात मळ्यात, ढोर गवार शुद्र नारी। सब ताडनके अधिकारी, मज रही गली मेरी मा सुनहरी कोठी में।' अशा कितीतरी नादगीत प्रधान मुखड्यांची, ते आशयसमृद्धीसाठी स्वाभाविकपणे उपयोजना करतात.

त्यांचे दुहेरी, तिहेरी किंवा विशेष शब्दप्रयोजनही कविता समृद्ध करण्यास हातभार लावतात. आणि हे उपजतच त्यांच्या प्रतिभेला भावले आहे. जात्यावर बसल्यावर ओवी सुचावी असे शब्दांमागून शब्द ते अभिजातपणे पेरीत जातात. अॅक्युरेट कती, तन्मयी मंथन, कृपेची पाभार, अजनबी पेरणी, खुरहीन घोडा, दुःखाची व्हायोलीन, लोफर मेलडी, उत्तुंग रामक्रीडा, चाळशोक बुलंडि, कंदमूळ लज्जागौरी, दुड्ड दुड्ड मंझील, पावलांची जर्द रूमझुम, उफराट्या पिसाची खैरीबांडी कोंबडी, पेट्रन उठलेलं वैरागी झाड, सुर्यकृपेचे दीर्घ दुखणे,निढावलेले निर्मनुष्य अंतःकरणाचे दगलबाज, पुष्टालेली अभिजात ढुंगणे, सोवळ्या अंगरख्याची बाजिंदी लुगडी, अशी कितीतरी उदाहरणे या संग्रहात सहज दिसून येतात.

श्री. नामदेव ढसाळ यांच्या आणखी वैशिष्ट्याचा निर्देश केला पाहिजे. आणि ते म्हणजे, त्यांचा शेलका शिवराळपणा व गुंगविणारी ग्राम्य लय. ते त्यांच्या समग्र व्यक्तित्वाचे स्वाभाविक अंग आहे. लिंगयोनीवाचक शब्दांनी कोंडलेल्या उद्रेकाला, अनावर संतापाला वाट करून देणे, हा त्यांचा प्रकृतिधर्मच आहे. जास्तीत जास्त राग, चीड, अवहेलना, अपमान करायचा तर तशाच जबऱ्या शब्दगोट्यांचा. ते भन्नाट मारा करतात. आणि तो इतका अचूक असतो की, लक्ष

छिन्नभिन्नही व्हावे आणि मनही हलकेमोकळे व्हावे. 'वऱ्हाडी ढंगांचे संमेलन' ही एक या दृष्टीने मात्र फसलेली, भट्टी बिघडलेली कविता आहे. हा एकच अपवाद नोंदावा लागतो.

श्री. नामदेव ढसाळांच्या कवितेचा आलेख चैतन्यमय व स्पर्शीन ठेवण्याचे कार्य, त्यांच्या पुणेरी महारी बोलीतील शब्दविशेषांनी केले आहे. डेग, डिंग्या, बोंडशी, रांड, डराखन, चौव्हाडडी, संदल, हेपलून लेंडकं, उटपटांग, लबडब, लथ, नस्तर, 'बिंदचाटे, ढाबळी ह्या शब्दांची शक्ती येथे द्विगुणीत झालेली दिसते.

'तुम्ही इयत्ता कंची तुही इयत्ता ही शीर्षकनामाची अखेरची कविता. ज्ञानामानापासून वंचित असलेल्यांच्या बेढंग्या जीवनाचे कोडे, त्यांनी शिक्षित सुसंस्कृतांपुढे घातले आहे. आहार-निद्रा-भय-मैथुनांच्या पशुवत पातळीवर जगणारा वर्गच, ढसाळांच्या तोंडून, संस्कृतिसंपन्नाना उलटा प्रश्न करीत आहे. यांच्या वैफल्याचे, विपन्नतेचे, कदन्नाचे, शिवराळपणाचे कारण कोण आणि काय? हे सांग? सांगता येत नसेल तर तू शिकलास काय? कसे? कुणापासून? कशासाठी ? या प्रश्नांची उत्तरे मराठीला मागणारा, एक अद्वितीय मानदंडच ढसाळांनी निर्माण केला आहे. मराठीचे रांडावपण कमी केले आहे. तिला चैतन्याचे व सौभाग्याचे लेणे चढविले आहे. त्यांच्या कविता वाचताना 'पिला हाऊसचा मृत्यू' नावाच्या कवितेतील ओळीच मला उद्धृत कराव्याशा वाटतात.

तुझ्या आयुष्याला पेलून धरणारी ही तीव्रतर साडेसाती
आज मलाही आनंद होतोय की तू तिच्याही पुढे
निघून जाऊ शकतोस.'

मलाही असंच म्हणायचं आहे. ह्या संग्रहाबद्दल !

**–केशव मेश्राम**

महर्षी दयानंद कॉलेज,
डॉ. एस्. एस्. राव मार्ग,
परळ, मुंबई - ४०० ०१२.

# छबुकलं दारिद्र्य


आपल्या सर्व यानतनांचं छबुकलं दारिद्र्य
त्याच्या बारशाला तुम्हाला जेवना आलं नाही, म्हणून
उट्टं काढू नका, भावबंदानो—

या आंगड्याटोपड्यान लबाड कसं छान छान दिसतं
फुलण्यापूर्वीच ते कोमेजून जाईल.
तेला दृष्ट लागू नये, म्हणून लावू द्या ना काळ्याशार रक्ताची तीट
आयुष्यातल्या खस्ता स्वस्त करून खेळवू द्या ना तेला– अंगाखांद्यांवर.
नेत्राचा दिवा, हाताचा पाळणा करता आला नाही तुम्हांला
तरी म्हणा ना तुम्ही :
'पडू झडू, माल वाढू.'
त्याच्या नुमन्या मर्दीपडशानं डिसमूड झालान
पोट हवकतं होय ते? त्याच्या पोटात झालं असेल
पिळकतंय होय ते? तेला मोडशी झाली असेल.
रडतं होय ते? रडण्यानं त्याला बाळसं येईल.

ये,ग, गाई, गोठ्यामंदी
बाळाला दूध दे वाटीमंदी.
हाड, ग, कुतरे, झाड, ग, पाय
बाळाला माझ्या आवडे साय.

तू सोन्याची सखुबाई बरं का.
तुला रुप्याचं हातपाय बरं का.
तू बाहेर जाऊ नकोस बरं का.
तुला पोरं धरून मारतील बरं का.
बाळाला जपून उचला, भावबंदांनो
ते अंगावर सू करील बरं का
आपल्या यातनांचं छबुकलं दारिद्र्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे




# अल्पायुषी चंद्रप्रकाश

हा अल्पायुषी चंद्रप्रकाश
प्राणात पेरून मी चाललो आहे
निळ्याशार समुद्रपृष्ठावरून
स्वप्नांच्या जखमा मांडत

ना कुणाची साथ आहे
ना कुणी साथीदार
कधी होणार भरती ?
कधी होणार ओहोटी ?
कधी मिळणार किनारा ?
की नुसतीच पावलांची उर्द रुमझुम ?

पाणी / चांदणं
या सर्वांमध्ये वाळूवरल्या माशासारखं माझं तडफडणं
खरंच माहीत नाही
माथ्यावर चंद्र थांबून किती वेळ झाला, ते !



# सैतानाबद्दल

अलीकडे मी काही
गळ्यात क्रूस अडकवून वावरत नाही

तिला म्हणालो,
घरातल्या सैतानाबद्दल दोन शब्द लिही :
तो किती क्रूर खेळ खेळतो तुझ्या प्राणाशी
कसा घालतो धांगडधिंगानंगानाच
कसा उठतो / बसतो
शेवटी विश्रब्ध होऊन जातो घरातल्या घरात शान्त

जेव्हा तिला वाटतं, गुलमोहरबद्दल मी बोलावं,
हातात हात जखडून समुद्रावरून जाताना
लाटांच्या शुभ्र पक्ष्यांना गोंजारावं,
घरातले / बाहेरले आडोशाचे कोन साधून
एकमेकांत मिसळून जावं...

अलीकडे हेच जमत नाही मला, मी होऊन जातो सैतान

सैतानी लीला करताना
हज्जार माणसं मला साक्षी लागतात
मी त्यांच्यात वावरतो, मिसळतो, त्यांच्यासारखा होतो

जमल्यास त्यांच्या सुखदुःखांना गोंजारतो
शक्य असल्यास वाटूनही घेतो
काहीच जमलं नाही तर अस्वलासारखा नाचत राहतो


अलीकडे ती दररोज तंबोरा लावून रियाज करते
जशी फडफडावी उफराट्या पिसांची खैरीबांडी कोंबडी
काळेपणाची नीट लावलेली अंडी
मानधनाची दामटी
वाटीत पहिल्या धारेची कंट्री
सोबत उष्ण रक्त
जिभेला डसलेला चंडोल

सैतान कधी सलगीने वागतो का माणसाशी ?
मी तिच्याशी सलगीने वागतो
सैतान कधी ऐकतो का स्टीरिओ ?
पाहतो टी. व्ही.? घराची घरंदाज रंगोटी-प्रायव्हसी? ?

सैतान उजेडाला घाबरतो
मी उजेडात वावरतो
अंधार झाला, की माझ्या जिवाला घोर लागतो
सैतान तिला फरफटत नेतो... तिचे राक्षसी चुंबन घेतो
तिच्यावर बलात्कार करतो

तिला म्हटलं, घरातल्या सैतानाबद्दल लिही
आणि तेच तिला जमलं नाही

आता सैतानावरच पाळी आली आहे
माईंड, सोल, बॉडी सरेंडर करण्याची
गळ्यात क्रूस घालण्याची



# अजून थोडा वेळ


अजून थोडा वेळ, वेडे
अजून थोडा वेळ—
तग धरून राहायला हवं

रसद पोहोचेल, न पोहोचेल
जिथे त्यांनी देहच केलाय काबीज
श्वासोच्छ्वासांना जखडले आहे साखळदंडांनी
तिथे हृदयातला कंदील विझवून कसे चालेल?'

जुलमाला काही हंगाम नसतो, की—
जो बरसत राहतो ठरावीक काळ

हेही दिवस जातील,
जसे जातात उन्हाळे पावसाळे

तो बघ दूरातुन
इन्कलाबचा ध्वनी झंकारून उठलाय!
ऐकतेस ना ?




# पतंगाबद्दल

निरभ्र आकाशाचा ठाव

मुळातच आपण आपलं आयुष्य गवढं बदवायला नको होतं
किती अॅक्युरेट कनी बांधली आपण
की बदवलेलं आयुष्य काही काळ राहू शकलं स्थिर
नंतर आपण खाल्ल्या हज्जार गोता
मारल्या गिरक्या
नाचलो मांज्याबरोबर
काही काळ ठेवला पतंग ताब्यात
दिला भरदोर
फिरकीवाला नाचत राहिला
आपल्या तालावर
गुलामाला अंदाज आला नाही वावटळीचा
हां हां म्हणता झाला आपला कटीपतंग


आता अवघ्या निरभ्र आकाशाकडे पाहणे
दूर राहिले ठाव घेणे



## लंगर

दूर समुद्रात लंगर टाकून बसलोय मी
सहजासहजी ध्यानीन
हे चरमसीमेला पोहोचलेलं माझं एकाकीपण
हे प्रदोगणारं नवथर हलाहल
या तन्मयी मंथनातून
पेटून उठलंय वैरागी झाड
मागच्या ज्वालांनी
ते गेले होते ग्रासून

या मुळापासून निघालेल्या
एकाकीपणाच्या अंगाईसाठी
कुठले शब्द वापरू ?
कुठले शब्द ?



## ल्हानुल्याची प्रार्थना

या कबरीला खोदणाऱ्या वेदना
हा प्रबंध अमृताचा
ही तृष्णा दारोदार भटकणारी
या अंधाराच्या वस्त्रात
गुदमरला नाहीस ना, ल्हानुल्या ?

हे बघ, तुला चोच फुटायला लागलीय
हे बघ, तुझ्या पंखांना फुलं यायला लागलीत,
थोडी कळ सहन कर
मग तुझे डोळे
पाहू शकतील आयुष्याचे घरटे.

मग परमेश्वर
झोपी जाईल शांत
तुझ्या जन्माचे
रडणे ऐकून


# भर

हे झाकाळून जाणारं कामासक्त पोर
हे आदिपुरुषा,
निराधार
निर्वासित
बेवारशी
होण्याच्या अगोदरच वाचव तेला.
या झुठ्या सबबीतून कशाची राख
सांडत सुटलायस तू ?

हे अनावृता
निर्वस्त्र होऊन ये सामोरा
तुझ्या हृदयाचा तर्क आजपर्यंत नव्हता ठीक
नव्हते तुझ्या डोळ्यांत पाणी
तुझ्या अनीतीनं सांडला होता आतंक
तुझ्या कृपेची पाखर
आजवर चिरीत राहिली आमची छाती
ही तुझी अजनबी पेरणी.
अंड फुटून रक्त ओकायला लावतोस तू

मी वर्षानुवर्ष अनुश्रुत राहिलोय
घडलेच नाही परिवर्तन जखमांचे खपल्यांत.

हे नंगाशा बाबा,
तुझ्या बलात्काराची हवस
त्या पोराचा रस्ता चुकवू नकोस, रे
आणखी नको शिळकीत भर
आणखी नको निर्वासितांत भर





# आरशाबद्दल

कशाला करू तुझी चकल्लस ?
तुझे शासन पारदर्शी
तिथे मज्जाव
तुझ्याच प्रतिबिंबाला.

तुझे नशीबच नकटे
नाक खाजवून
कशाला देऊ तुला त्रास ?


उगाच राहतोस
मनातल्या मनात
विरहिणीसारखा
एक दिवस
तुझंही चकोर दुःख
होऊन जाईल उद्भ्रांत.





## ज्वर

हा पाण्याला भरलेला ज्वर कसला ?
हा दवातून पसरणारा गंध कुठला ?
अतिथी,
फिर माघारी
एक नाचणारे अस्वल –
मृत्यू :
एक मुक्ती मागणारा कलरव–
मृत्यू :
एक तान्हे बाळ होत जाणारी यातना
मृत्यू :
एक शिडी चढत जाणारी पीडा –
मृत्यू :
तमाम नक्षत्रांत
निःसार होत जाणारा महिमा
समुद्र तहानलेला
अतिथी, फीर माघारी



# आयना

आयन्यातलं विप्लव दुःख
विप्लव दुःखाचं प्रतिबिंब शनैः शनैः
कयामती रात्र
येते उमळून चहूबाजूंनी
हा एक तेज दौर रफ्तारीचा

कंच्या अबलख घोड्याच्या पाठीवरून
वाहताहेत हे निराश्रित वारे ?

आयना येतो अंतर्यामी तडकून
उघड्यावर पडतात
आयन्यातील अंतःस्थळं
डोळ्यांच्या मर्यादा ओलांडून
मृगतृष्णेतल्या समुद्राची गाज
वाजत राहते अथांग
सोबत निरंतर संघर्षाची पीडा
प्रणयलहर बनून
लपेटू लागते अंगाअंगाला
थीमी थीमी

मराठी ... संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# म्हशी


तीन झाल्या, तीन झाल्या
जशा गावात म्हशी व्याल्या

पहिल्या म्हशीला, म्हशीला, घालते आंघोळ
पारड्याला देखता देखता, भरून येतील, ग, आचाळ

दुसरी म्हैस-म्हैस वऱ्हाडी
तिला धाडला व्हता, ग मुऱ्हाळी
ती पाण्यातून, पाण्यातून, ग उठंना
ती गूळ, ग, गूळ ग खाईना
जन्मा घातली पारडी, पारडी तिला थान ही देईना

तिसरी म्हैस, ग, म्हैस ग, गमोशी
पुण्याला जाताना तिला आडवी येते मोशी
ती वढाळ, वढाळ मायंदाळी
तिच्यासाठी वंशबूड झाली कसायांच्या आळी


तीन झाल्या, तीन झाल्या
आता घरातही म्हशी व्याल्या



## कविता

हा असा
अवना जोंधळा पानांवर

हा असा
चतुरंग चढतो
मरणावर



# माझी मऊभोर स्वच्छ पिसे

माझी मऊभोर स्वच्छ पिसे
लावली त्यांनी बाणाला


गेन सर्जनाच्या काळान त्यांनी केला माझाच वध.
पोखरून टाकले मला – खोल दीर्घ जखमेने

किती निर्ढावलेले निर्मनुष्य अंत: करणाचे दगलबाज आहेत ते,
की ज्यांच्या काळजांतल्या गंगायमुना शुष्क झाल्या
नि पसरला सुपीक प्रदेशान दुष्काळ
मारले गेले जीवजिवाणू सुकाणू

ध्वजामारखी फडफडण्याची
हुतात्म्यामारखी छानीवर गोळया झेलण्याची
होनी मला जन्मजान इच्छा

खरेच, त्यांनी मला विस्तारू दिले नाही
खरेच, त्यांनी मला प्रकाशू दिले नाही.
झेपावणाऱ्या मूर्यफुलाला त्यांनी अशी वांझपणाची कीड लावली
आपल्याच कलुषी हानांनी माथ्यावरली सावली ढाळली
हा असा सर्वदूर भूनकाळ मेंदूच्या काचेवर येनो जमून
स्वन:च्याच अपत्याची नरडी घोटणारी मांजर लखख जाते नळपून

नि रक्ताच्या थारोळयान अतृप्त मरपटणारा
प्राण येनो गदगदून गदगदून.



## मादरी ज़ुबान

**किती जखडून घेतले हे स्वत: ला स्वत: च**
लंगडी-लंगडीचा खेळ खेळू म्हटलं,
तर मलाच लंगडी खेळता येत नाही
इथे तर वासरांनाच लंगडी गाय शहाणी


कमायाला गाय धार्जीण
आणि गाईला कसाई

हां हां म्हणता आम्ही आव घेतो समर्थांचाही
पण खरं सांगू ? आमचीच फाटलेली असते बाही

**आम्ही निद्रेतही गात असतो मुक्तीचं गाणं लाजिरवाणं**

पहिले तर आम्ही स्वत:लाच विकलेले असते
फक्त हे सांगण्यासाठी आमच्याकडे मादरी ज़ुबान नाही

तरीही
गहूभऱ्याहून आमचीच मोठी
आम्ही अखिल भारतीय वगैरे क्रांतिकारक
सर्वत्र सर्व्या दीनदुबळ्या दलितांसाठी
सर्वस्व.
महाकाळ




## हे कत्तलखोर

हे कत्तलखोर
आणतायत आव प्रेषितांचा

हे सूर्यकृपेचे दीर्घ दुखणे
हा संकेत कुठल्या शुभ ग्रहगचा ?

ही एक आगीची लहर
जणू प्रेयसी अन्याचाराची
कुठल्या रंगीन संगीन दृश्याभोवनी
हे रक्त गस्त घालतंय?
तुम्ही करू शकना का ?
या दुःखाची व्याख्या ?
ओळखू शकना का
त्याचं लिंगभिंग चौखूर ?



## क्षुद्र गोष्ट

देशकाला डावलणारं हे एक सार्वत्रिक गुपित


जे कळलं पहिल्याचछुट्ट अमरपट्टा घेऊन आलेल्या डासांना

माझ्या ताटातली भाकरी त्यानंच चोरली होती
माझ्या ग्लासातली दारू तोच प्याला होता - अघाश्यासारखा

आणि वरनं म्हणला होता : मी नाय खान नि माझं मन त्यात

डास ही तशी क्षुद्रच गोष्ट
त्यानं केलेल्या चोरीसाठी ते होते आय विटनेस्
त्यानं चिक्कार डासांना देऊ पाहिली आमिषं
परन्तु एकही डास नाही फुटला त्याला
नंतर त्याने डास निर्मुलनाची मोहीम आखली
अत्यंत जालीम विष त्यानं फवारून टाकलं सर्वत्र
तर डासांच्या पणतूनं त्या विषालाही टाकलं पचवून
आणि तो चावू लागला त्याच्याच फध्या देहाला अष्टौप्रहर

नंतर त्याला असं वाटू लागलं, की
जगातली कुठलीही क्षुद्र गोष्ट नाही येत चिरडता
–धंदेवाईक गुन्हेगारालाही.




# कसा विहरू ?

कसा विहरू दुःख चोचीत धरून
किती ठेवू इंद्रियं ताजीतवानी ?
किती सांभाळू हे बीज ?
कंचा खुरहीन घोडा
नृत्य करतो या जखमेवर ?

हे अनामिका, वाहून ने या चंद्रवेणा
बघ ही दुःखाची व्हायोलिन
एक गूढ पांघरून
झोपलेय स्वप्नवृक्षाखाली
शताब्दीची चादर पांघरून

एक पहाटेचाही उदय होत नाही
एक पाखरेही निवांत झोपी जात नाहीत

कंच्या शहाण्यांनी लिहून ठेवलीय
ही लोफर मेलडी ?



## वारलेल्या माणसाची गोष्ट


एवढ्याने कसा वारू लागलो मी ?

अजून तर डोक्यावरून पुरते पाणीही वाहवले नाही.
हा प्रत्येक संदर्भ
निःसंदर्भाच्या चकमकीमधला
ह्या घटनांच्या घर्षणातून
कुठल्या अभावांचे साजूक बाळंतपण ?

माणूस ज़मीन नांगरतो,
की ज़मीन माणूस नांगरते ?
माणसाला शिस्न असते,
की शिस्नाला माणूस असतो ?

मी सकाळी झोपेतून उठलो,
की सकाळ माझ्यातून उठली ?
हा अनमोल चमत्कार कुठला ?
रात्रीच्या बाहुपाशात सूर्य पहुडतोय सुखशय्या
दिवसाचा विनयभंग करू पाहतोय चंद्र
खरंच, मला नाक आहे कां ?
खरंच, मला गुदद्वार आहे का ?
ही खालून वरून सरकणारी हवा कुठली ?
हा अवयवांचा चोरबाजार
यातलं काय काय माझं ?
माझ्या चेहऱ्याचं नाव कुठलं ?


हे मसनवटीच्या वाटेवर बसून
खैरात उकळणारे
हे माझ्या मोयऱ्या यमदूतांना,
ज़रा जपून
उगाच वारशील विरशील या सभ्य लोकांच्या भाऊगर्दीत



## भाड

फाटलेल्या सदऱ्याला टाके घालशील
फुलपाखरांची सावली माथ्यावर धरशील
माकडहाड ओळखशील
वाळून टिपण केलेली पावलं हुंगशील,
की नुसनाच
कोर्टाच्या आवारानला
संज्ञाहीन पुनळा होशील ?

हे लुबऱ्या इच्छे,
की नुसनीच छिनाल पौर्णिमेची
भाड खाशील ?



# कुरणे

कुरणे चरतात जनावरात
वैरागी ऊन सांडले आहे त्यांच्या अंगावर
कुरणे अशी उन्हात माणसाळतात
माणसे फेर धरतात कुरणाभोवती
अजून थोडया वेळाने संध्याकाळ सांडून जाईल
उन्हाचा मोर कोवळा कोवळा होत जाईल पश्चिमेला वेगाने
थांबेल एकटाची उत्तुंग रासक्रीडा
आणि मौन पांघरतील कुरणातील दगड
कुरणाची मऊमऊ लुसलुशीत पिवळीशार शरीरं

त्यांत रोवलेली शिशिरागमनी लखलखीत झाडे
कुरणांच्या हृदयाला फुटतात फांद्या अशा ऐन दुपारी

गरीब मुरारी स्वर छेडले जातात वेळूच्या बनातून
कुरणांच्या नसानसातून विद्रोहतो नाद
उचमळते हृदयातले पाणी
कुरणांची होते बासरी
गरिबाघरच्या गाया लडिवाळतात अल्लडपणे कुरणांतून
त्यांच्या अंगावरले दारिद्र्य
वाळून जाते बासरीच्या कष्टाळू हाताने
करवंदी जाळीतले निद्रिस्त वाघ लपेटले जातात स्वरांनी
ओघातल्या ओघात त्यांना फुटतो इंद्रधनुष्य
कुरणांच्या अंगातून सळसळतात नाग
नागांना नसतात कान, बासरी सांडते अंतर्यामातून
कुरणमग्न झालेली एक राधा पसरते अशी कुरणांवर
तिच्या पायरवाने घोटाळतात कोल्हीकुत्री

दूर कुरणांच्या माथ्यावर मरून पडलेली एक गावडल्यातील म्हैस
वाभाडलेले इतस्ततः तिचे शरीर
विध्वंस झालेला तिच्या शरीराचा, शिल्लक तोंड आणि शिंगोटे
डोळे तिचे सताड उघडे शुभ्र कळीदार
तिच्या डोळ्यांत सांडलेले आकाश : गिधाडांचे थवे
आणि देशातले दारिद्र्य


कुरणे रांगत येतात शहरापर्यंत
कुरणांचा होतो हृदयपालट
कुरणे पुन्हा जनावरांमाणसांसकट घुसतात कारखान्यात
आणि वाहते नदी रक्ताची कुरणे बनून.

# असेंब्ली / वऱ्हाडी ढंगाचे पावसाळी अधिवेशन

अध्यक्ष महोदय,
मी सभागृहाचा मान ठेवून
तुम्हाले इनंती करतो, की
माही गांड धुन्याची मागणी
सभागृहासमोर मांडावी,
अशी मी आग्रहाची इनंती करतो

मागणीक्रमांक अमुक तमुक
मी माही गांड धुतो, पन मोहा हात लई दु:खी हाय
ज्याला व्हय म्हनायचंय, त्यानं व्हय म्हनावं
नाय म्हनायचंय, त्यानं नायबी म्हनावं
व्हयचं बहुमत, व्हयचं बहुमत
मागणी पास
तुले काय गे बाप्पा
तुले काय गे बाप्पा
महे येले व्हयाले
सुखी कळसतो नि दु:खी कळसतो
उठसतो न ढोससतो
घोडे मरते ओझ्याखाली
आनी शिंगरू मरते येरझारखाली
ढेंग जातो गटागटा
आनी अंडाला उगाच हेलपाटा

अध्यक्ष महोदय,
मी सभागृहाचा मान ठेवून
तुम्हाले इनंती करतो, की–




## पावसाचे गाणे

पोर नान्हे टाकुनीया कुठे गेली माय त्याची ?
घर उघडे वाघडे सर थांबे पावसाची.

सारा संसार फुटका उतरंड गाडग्यांची
गळतीला असे नाद, वाण टोप-भगुल्यांची

भुई झाली मायेनं ओली बाळ चोखीनो आंगठा
पावसाला फुटे स्तन ऊब त्याला चिरगुटाची

साताजन्मांचे दारिद्र्य, भूक भूक दाही दिशा
माय फिरे गणगणा वाट नोकडी पृथ्वीची



**तुम्ही**
हे आमच्यापर्यंत पोहचलेलं सर्जनशील स्वातंत्र्य

त्याच्या पौरुषत्वाचा उच्छेद करून


तुम्ही केलेत त्याचे नामांतर हिजड्यात
दिवसाढवळ्या अहेवपणाला तुम्ही
अशी लथ लावलीत

ही चौंडकी / ही नाचणारी अर्धनग्नारी थडं
हा मंडल
हे नक्षत्रांचे गंडावपण

दीक्षाभिक्षा
वेशपरिवेश
वामा भूत्वा येजम् पराम्
तुम्ही घडवून आणलंत हे तांत्रिकीकरण

दिव्यवर्षत गेले आहे टळून
तरीही थांबवली नाहीत तुम्ही ही छळक्रीडा
हा बहुचरा सांकेतिक स्वीकार कशासाठी ?
हे आदिम निषेधभय कुणासाठी ?
हे अस्खलित हिजड्यांनो,
आम्हां दीनदुबळ्यांसोबत नाचत रहा, गात रहा.

मज रही गली, मेरी मां
सुनहरी कोठेमें
बिन मांके बच्चे, हांजी
बिन बापके बच्चे, हांजी
हे चैतन्याच्या घोड्यांनो,
शेवटी तुम्ही हे असं वाल्मिकीचं वारूळ करून टाकलंत करंट्यांनो!
तुमच्या पुराणकथांच्या बाजिंद्या कोकशास्त्रांची
आम्हाला किळस यायला लागलीय पुन्हा पुन्हा.




# आठवण

तुझी आठवण
अकाली उद्भवलेला विटाळ

तुझी आठवण
टाचेत सलणारा काटा

तुझी आठवण
दुपारी वाहून आणलेला आरमा
तुझी आठवण
राखून ठेवलेलं आभाळ
तुझी आठवण
टांगून ठेवलेली भोनधार



## खळाळ पाण्यात


खळाळ पाण्यान फेड्डन टाक आना नरी ही वेदांगाची लुगडी
मारी वाढच कशी खुरट्टन घुसमट्टन टाकली होनी न्यांनी.

ह्या निर्धूसरात
वृक्षवल्लरी धरू लागल्यात फेर
यात पुन्हा एकदा नवीन दुःखाला जाग येईल.
दगडासारखं शान्त नि स्थिर राहिलोच नाही आपण कधी
हे फार बरे झाले.

हे किरणांचे घनदाट खोल आर्त आरे
आरपार भिडून गेले आहे रक्तात
आपल्या अपंग माझी दुःखाचा ठाव होऊ लागलाहे परावर्तीत

'बैल गाभण, तर नेगवा महिना'
म्हणायचा नकार दिला आपण त्यांना
आणि पाहता पाहता दीर्घयुग निद्रेतून चरफडत आलो आपण
या अनाथ उंबरठ्यापर्यंत.
केलेल्या लढायांची
फाटलेल्या हृदयांची
झाली आहे ठसठसणारी धमनी
मरणाचेही मरण ओलांडून बसलोत आपण

कालचे स्थलांतरीत पशु-पक्षी पुन्हा परतू लागलेयत
आपल्या प्रदेशाकडे.
आणि हा देवदत्ता पलिकडचा पाऊस लागलाहे कोसळू
आपलाही बहकाव संपेल ना ?
ओळखू का आपण एकमेकांना?
ओढग्रस्त सुसाट पाण्याच्या
पहिल्या जिभेसारखं
पोटात घेत सर्व चीजवस्तूंना
अवकाळ विवकाळ.



# निळू फुले / एक निमित्त वरपांगी

किनी नरी लोक आहेन जाब विचारणारे
मगळी मगळीकडे
जन्माला आल्यापासून तू सोडवतो आहेस
हा गुन्ता
वारतो आहेस पाणी
एक जन्मभऱ्याचा स्नेह
एक गुलबक्षी टोचणी
बापाच्या अंडकोषान कितीतरी गोष्टी
शिकून घेनल्यास अगोदर
नंतर
उरल्या सुरल्यांची नालीम घेनलीस
आईच्या पिशवीन
तू शड्डू ठोकून उभा राहिलास
दुनियेच्या बाजारान
'या गड्याला जोड
येऊ द्या, जोड! '


प्रन्येक दिवम घेऊन येतो तुझ्यासाठी छबिना
प्रन्येक रात्र घेऊन येते तुझ्यासाठी बिछाना
आना कशाला पाळनोस ही योनीशुचिना?

कालपर्यंत होतास तुकटा तिकटा
आज कशाला होतोयस, रे, एकटा एकटा?

हा सर्व बावन्नाक्षरांचा खेळ
आम्ही नाही आहोत द्रष्टे
कशाला ठेवू तुझ्या करनखऱ्यावर बोटं ?

दुःखाला चढवला जातोय
ब्राम्हणी गंध
मुखाला घातली जातेय
पंजाबी ढंगाची मिठी,
त्याचं काय आहे ?
त्याचा एक घोळ आहे
आपले सगळेच येरूसारखे
बापाशी झोपून
आईला सलाम करणारे.


हे सम्राटा!
या गल्ली-कुचीतून
वणवण फिरतोय
दिशान्त करणारा बहुरूपी
या अंतरंगी मोंगाड्याला
ओळखतोयस का तू ?
मग अभिनिवेश कशाला त्याच्या नावाचा?
तुझ्यासाठी दिला जातोय
या रंगमंदिरांना विकारांचा नूतन रंग




दुखावल्या गेलेल्या देवदार्मींची गोंजारली जातायत पिसं
खवलं सोललेल्या माशाची लावली जातायत लग्नं
भिडले जातायत पिंडांना कावळे
खेळवली जातेय क्रमांची मिरवणूक
कव्र उकलून नाचते आहे तुझी तंनोनंत ममी

हे अगाध वीर्या,
मद्यार्काच्या मोनजळात
पाहून घे रे पुन्हा एकदा तुझा चेहरा
शनकाच्या सुतकाचा तू पाळला नाहीस जाच
ना खाल्लीस कच
ना खाल्लीस डच
तरी का सांडत आलायस ही अशी तुझी
अमोघ अश्वशक्ती ?

हे चित्राक्षर
ही मुक्तीची किमया
का पिंडीनं जखडून ठेवलाय हा लिंगाचा आदित्य?
हा तुझा नि:श्वास
का झालाय दीर्घायुष्याच्या देवाचा सहायक ?
पुन्हा एकदा आळवाच्या पाण्यासारखा
ओघळ ना!
होऊ दे स्खलन
कशाला उगाच ही जलतत्त्वाला
बद्धकोष्ठता ?
घाल जागरण
तुझ्या
लोखंड पचविणाऱ्या आतड्यांचे!





## त्यांनी ईश्वराला हाकारले

त्यांच्या राज्यात अपभ्रंशाचे वारे वाहते आहे
स्वतःच्या अमदानीत त्यांनी चिक्कारच गाढवे नाचवली
गाढवे देखील कमरेचं मोडून धिंगनाल नाचली
योनींचे दिल्ली-दरवाजे : शिश्नांच्या ग्रीकमुद्रा

त्यांनी महजगन्या कोरून ठेवल्या आपल्या चुत्तड नशिबावर
अघोरी नपाला साक्षान जवळ करून नांदवले
त्यांनी अध्यात्म्याचे दत्तदिगंबरी नाणे, गोजिरवाणे
जंगले तुडवीन त्यांनी वाळवंटे जवळ केली
टाळ-पखवाजाच्या गजरान अस्नित्वाची पोकळी वाजवली
खाली-वर केसांचे डोंगर वाढवून त्यांनी मारल्या ब्रह्माच्या निरगाठी
वेळी अवेळी लेंडकं टाकीन त्यांनी जखडल्या सोडल्या
अनंताच्या दिठीमिठी
स्वन:च स्वन:न उनरून
अंनर्यामाच्याही अंनर्यामी प्रकाशान त्यांनी सनाड पाहिला
स्वन:च ईश्वराशी केलेला व्यभिचार आणि
भिजलेले निन्ही नाळ सप्नपानाळ ईश्वराचे गर्भाशय
आणि रुजू घानलेली द्विदल अद्वितीय बी.
बीज आधि, की गर्भाशय आधि?
गर्भधारणा करणारा आधी, की गर्भ आधि?
जसं : बीज आधी की झाड आधी ?
त्यांनी भेदिक होऊन अंकुराला हाकारले
अंकुरानं ओ दिली
त्यांनी जमिनीला हाकारले
जमिनीनं ओ दिली
त्यांनी वीर्याला हाकारले
वीर्यानं ओ दिली
त्यांनी ईश्वराला हाकारले
ईश्वरानं ओ दिली
त्यांनी आदिअंनाला हाकारले
आदिअंनानं ओ दिली
त्यांनी स्वन:लाही हाकारले
त्यांनी स्वत:लाही ओ दिली
गंध-टिळा-चिपळ्या-रुद्राक्षमाळा, खापर-खडावा-चिमटा-त्रिशूळ

पंचगव्य-पोटशूळ-भगवं-नागवं यज्ञाने उबलेली संज्ञा
त्यांची पुष्टावलेली अभिजात ढुंगणे
त्यांचे फिरलेले वैरागी दंड
कमरेखाली विस्तारत जाणारी अनंताच्या श्यामाची शाकाहारी चरबी
ते उपवासना स्वत:ला नपे न नपे
मधून मधून उष्टावतात स्वत:ची किनखापी चोच मोहनचाऱ्याने
साक्षात्काराच्या दिवशी ते उघडतात हृदयाचे फडताळ
भोवऱ्यासारख्या दुनियेला ते मंत्राने भारून टाकतात
गळ्यात गंडादोरा बांधतात ते पवित्र पाणी शिंपून सैतानाला
अवसेपुनवेला नाचवतात
अंगारने धगधगलेल्या शय्येवर ते पहुडतात शेषशायीच्या सावलीत
सोवळ्या अंगरख्याची बाजिंदी लुगडी ते घालतात
ब्रह्माच्या तारेवर वाळत


मी त्यांना विचारतो,
"तुमच्या ईश्वराच्या कातडीचा रंग कसा आहे ?"
ते उत्तरतात,
"आमच्या कातडीसारखा !
मी त्यांना विचारतो,
"तुम्ही स्वत:ला कसे बदलता ?"
ते उत्तरतात,
"ईश्वरासारखे !"
मी त्यांना विचारतो,
"ईश्वर कसा बदलतो ?"
ते उत्तरतात,
"वठलेल्या वृक्षाला पालवी फुटल्यासारखा."
मी त्यांना विचारतो,
"तुमचा हा नादान अजनबी ईश्वर कुठे राहतो ?"
ते उत्तरतात,

"तुम्ही स्वत:त डोकावून पहा, कोंदणातल्या हिरकणी-
मारखा, तो तुमच्यात लकाकताना दिसेल."

मी कष्टाने स्वत:त डोकावून पाहतो
श्वासनलिका-अन्ननलिका-फुफ्फुसे-हृदय
यकृत-जठर-पित्ताशय-लहान आतडे-मोठे आतडे-शेवटी गुदद्वार
अन्न-पाणी-चोथा-इंधन चक्राकार

ते म्हणतात, बाळ, हे येरागबाळ्याचे काम नाही
ईश्वर पाहण्यासाठी डोळे तैयार व्हावे लागतात
स्वत:वर प्रचंड वारूळे वाढवावी लागतात.
अष्टौप्रहर ईश्वराच्या बेंबीचा ध्यास घ्यावा लागतो
ते प्रलयंकारी हसतात
बेटा, तू अजून लहान आहेस
कवटात आहेस
अजून तुझा जार वळायचा आहे
तू आमच्यासारखा ईश्वराला हाकार, तो तुला ओ देईल.
तू आमच्यासारखा त्याच्या दिशेने चाल, तो तुझ्यामागोमाग येईल
तू त्याच्या नावाचा जप कर, तो तुझ्यात गर्भासारखा अंकुरेल
मी त्यांच्यासारखा वागतो
मगेसोयरे वेड्यात काढतात
मी त्यांच्यासारखा वागतो
बोंडशी पोरे दगड मारतात
मी त्यांच्यासारखा वागतो
लोक मेंटलची गाडी मागवतात, ठाण्याला धाडतात
त्यांनी ईश्वराला हाकारले

थू: त्या ईश्वराच्या मायला!
एकदा तरी भडव्याने मुंगसासारखे तोंड दाखवायला हवे होते!




# गुलाबी आयाळीचा घोडा

मला स्वातंत्र्य आवडतं
ते छान असतं समुद्रासारखं,

घोडा
या, परिचय करून घेऊ त्याचा
शतकांच्या सुळावर चढताना
त्यानं पाहिलंय आपल्याला.
आपलं सर्व काही सुरू होतं त्याच्यापासून
उत्तरदेहाचं शेषदुःख
आणि
आत्म्याचं श्यामाक्षर
वासनेच्या किनाऱ्याकडे घेऊन जाणारा हा

ययातीचा घोडा नाही
आयुष्य नाही हे पुराणातल्या वांग्याचे भरीत.
कोण असे आहेत ते ?
ज्यांची वस्त्रे
दारिद्र्याच्या पावसाने भिजलीच नाहीत ?
त्याच्या चौखुरांची गुलाबद्राही जर रंगवून
गेली आहे प्रत्येकाचे आयुष्य,
मग एवढा बवाल कशासाठी ?
स्वत:तल्या अश्वमेधी घोड्याला
दौडू द्या ना बेलगाम
किती निष्पाप निरागस सुंदराला आकार देत जातो तो!
त्याच्या विश्वात्मक दौडीने
खडतराला मिळून जातो आधार
हरेक बीज राहते गर्भार
किती सुलभ होऊन जातो जीवनोत्सव!

वेडातच सात कशाला दौडायला हवेत ?
ना इथं रक्तपानाचं संमोहन
ना इथं महायुद्धाचा नरसंहार
या रे या रे वासरांनो
राजरोस टोका यावर मांड
याच्या चौफेर वावराने फुलात भरतो प्राण
दु:खी आयुष्यात वारा वाजवतो बासरी
मौसमांचा होऊन जातो मोर
आणि अश्रूंचे मोती
गुलाबी आयाळ : गुलाबी डोळे
गुलाबी शेपटी : गुलाबी खूर
हा धावतोय
दिशान्त.




## दंगल

स्वत:चीच सावली
खायला उठते स्वत:ला
जखम धरत नाही खपली
तिचं नुसतं वयच वाढतं
काळ्या वसंताचं उद्घाटन
करून जातात डोळे
होते निर्भर्त्सना

सजीव प्रेताची
हेही किती थोर!
प्रवाहाच्या उलट पोहत जाणं
अखेरचा आघात होईल
सत्ननीवर
थांबा, वाट पाहा
तिच्या तख्ताच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होताना
रात्र आहे मुकी
वस्तीही
सन्नाट शांतता ज्वालामुखीला
करू पाहते आहे मोनी
ही अनोळखी चंद्रहाक
थरारून सोडते लावण्याला
ही घुसळण समुद्राची
ही घुसमट हृदयाची
हे रक्त बांध तोडून सुसाट तर धावणार नाही ?
वस्ती पाहते आहे
आपणांकडे दुर्बल होऊन
तिच्या निर्ममतेला कधी वाचा फुटेल ?


रक्तपात पाहिला, की
माणूस माणसासारखा वागायला लागतो
माणसं चिलटासारखी मरायला लागली, की
माणसाला माणसांची किंमत कळते
दंगल एक शहाणपण शिकवून जाते
माणसांना
दंगल एक दर्दभरी कविता शिकवून जाते माणसाला .
आपण टाळ्या वाजवा
आणि म्हणा, वन्समोअर/ वन्समोअर!



## मावळतीचे गाणे

दिवसाच्या मावळतीचे गाणे
उतरू लागले आहे डोंगरदऱ्यातून खाली.
अवघ्या जन्माचीच पीडा थकून आलीय
गवताच्या आई,
तुझ्या कुशीतल्या फुलांनाही पडू लागली आहे
झोपेची भुरळ
समदा दिवस
खेळून बागडून
ती कोमेजलीयत

गावदलासोबत त्यांचेही सवंगडी
परतून गेले आहेत घराकडे
त्यांनाही झोपू दे ना
आईच्या पंखांत निःश्रान्त.




# जनरल वॉर्ड

देव : माणसाने मारलेली एक अस्खलित थाप
डॉक्टर : माणसाने मारलेल्या हाकेला मिळालेले सहीसही उत्तर
हे प्रस्थापित शब्दांनो,
तुम्हाला झाला आहे अभिज्ञानपणाचा अर्धांगवायू
तुमची वळून गेलेली नोनरी
तुमच्या फिरलेल्या नजरा
हे शब्दांनो, यांना इथे जनरल वॉर्डात।
अरे, ह्या नुसत्या खाटा नाहीत
अरे, हे नुस्ते पेशंट नाहीत!
या शोकान्तिका सुखान्तिका अज्ञावधी
हे कथांचे नायक! अधिनायक
ही खलनायकांची खलबते
ह्या दर्पणासारख्या बोलणाऱ्या बांगडी मैना!
ह्या सिस्टर। ह्या नर्सेस
हे वॉर्ड-बॉय। हे परीट, न्हावी
हे मेहतर। ह्या आया

हे ग्लुकोज । हे सलाईन
ह्या निदानग्रस्त लॅबोरेटऱ्या
हे उतरले जाणारे एक्स-रे कर्माधर्माचे
ह्या बी कॉम्प्लेक्स, ह्या झोपेच्या गोळ्या
हे सर्व वातावरण
ही सगळी रांगडी माणसे
ह्याच्या मनाच्या जागा डेटॉलने
झालेल्या स्वच्छ निर्जंतुक
हे जन्माचे घाण धुणारे कुशल

हे शब्दांनो, या ना इथे विश्रांतीला
पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत
जरा याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्या ना/
जरा याही पुष्पवती वृक्षाच्या छायेत रमून घ्या ना /
जरा याही धमणीचा रिदम ऐकून घ्या ना /
कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल

आज कोणालाही विमुक्ती नाही
आज नोंदीलाही मृत्यु नाही
आज गंभीरचा खाट क्रमांक नाही
हे अभिजात शब्दांनो,
कदाचित आलात आपद्ग्रस्त होऊन
तर तुमच्याही जखमांवर सन्तुरी मोरपिसांची
माय पसरेल
अरे, ह्या
हेन्स अँडरसनच्या कथानकातल्याही पऱ्या
अलगद हळुवार वावरतात इथं थुई थुई /
एक call of the valley ची जुगलबंदी
शहरातल्या अनाथ आयुष्यांना सनाथ करणारी





## गोची

आपण / आपले नावगाव / वगैरे होऊ लागते / झूठ
आपलेच अवयव / आपल्यावर होऊ लागनात / रुष्ट
तेव्हा मोठी गम्मत होऊ लागते
आपण होऊन जानो दिलहवाल
ओळखीचे रस्तेसुद्धा आपल्याला चक्करमध्ये टाकतात


लबडब आणि शरीराचे सर्वच ध्वनी
आपल्या साडे तीन इंची उदात्तीकरणाला गांगरून टाकतात
आपले होऊन जाते शानदार कोडे

आपण म्हणू लागतो
'गोची, गोची, हुप
तुझ्या शेंडीला शेरभर तुप!

खिजवलेल्या वानरासारखे आपण आपल्यावर
दात विचकतो
आणि भेदरलेल्या पोरांसारखी आपली धांदल उडून जाते

हावळीवर नाराज झालेली कबुतरं
दाण्यापाण्याच्या गोष्टीत /
माना मोडून अडकून पडायचं नाकारतात /
त्यांना अंतरंगात तरी किती बांधून ठेवायचं ?
त्यांना अंतरंगातले दाणेच वेचायला जर आला असेल कंटाळा,
तर त्यांनाही कधी मधी द्यावं सैल सोडून
आणि राजीखुशीनं करून घ्यावी
आपलीच दाणादाण
तिन्ही ताळ सप्तपाताळ

कोलॅप्स होण्यात देखील गंमत असते!
आयुष्याच्या दांडीवर
किती वेळ ताटकळत उभे राहायचं?
धड मावळतीही नाही! धड उगवतीही नाही!
तरीही म्हणायचं,
सुसरीण बाय,
सुसरीण बाय,
तुझी पाठण मऊ




## मेंदूच आपल्या

मेंदूच आपल्या सर्व आज्ञा माघारी घ्यायला लागलाय
आणि तो तर मूठीत प्राजक्ताची फुले घेऊन तिला
शोधायला निघालाय

हां हां म्हणता दुनियेला ही उलटून टाकायला निघालेली तरफ
आज आपल्याच थुंकीवर मालकी नाही तिची
चक्रवर्ती किंवा तहन

हे दुनियेचे अंतरंग
हे दुनियेचे आंतरविरोध, हा धुमसणारा गदारोळ
ही निर्वस्त्र सोलून पडलेली अगतिक आयुष्ये
हे भारद्वाज महाकाव्यानंतरचे
हे रक्तवृक्ष थिजून गेलेले
हे सर्वत्र पसरलेले शुभ्र पर्वतप्राय दिगंत
ही मालिंद्रासारखी रेखलेली आडे
भाळावर
हे कान पडलेले ओझ्याचे लंगडे गाढव.
चाललेले दुडदुड मंझिलकडे.

स्वतःच्याच अंतरंगात खडा टाकून
शांत स्थितप्रज्ञ झालेला हा वारा
हे क्षितिजरेषेवर झुलणारे झाड
त्याची किरणे डोळ्यांना लुसणारी
हे माझ्या गहिवरल्या मानवता-वाद्यांनो.
आता ऊटपटांग होऊ द्या तुमच्या दयेचं नागडेपण
हे तुमच्या दयेचं बूमरँग
तिच्या लावण्यवती डोळ्यांना अश्रू तर करून जाणार नाही ना ?
माणसाच्या देहातील उणतीच असते प्रचंड क्रूर
ज्यात जळून जातात, मेंदूच्याही तत्त्यापलिकडील
फिनिक्स
आणि एक लोढणे
इच्छेला टांगत ठेवते



## माझ्या दफनविधीची गोष्ट

अखेर केलेनच ना दफन माझे ?


खात्री करून घेतलीन ना
मी मेलोय, वगैरेची ?

मातीआड दुःख शीतल

वेड्यांनो, मला असं
एकटं टाकून गेलात ?

आता हळूहळू माझा
मृतदेह सडत सडत जाईल.
नंतर कुजून कुजून
फटकन फुगा फुटेल
नंतर किड्यामुंग्यांची वर्दळ वळवळ
वगैरे
नंतर साजूक मांसखत

माझ्याच घाणीचा वास
मलाच घ्यायला लावलात तुम्ही
छान, छान !





किंवा नाकावर
रुमाल धरु ?
किंवा तोंडावर
बोट ठेवू ?

आपण सर्वांचेच
उत्तरदायित्व मानतो.
खासेच्या आत मी
खासेच्या बाहेर तुम्ही
या पावसात
माझ्या खासेला जगतारी
बनवणाऱ्या कलावंत गोगलगाया
त्यांच्या चिजेला
दाद द्यायला तरी
जमेल ना तुम्हांला ?
अरे, हो,
पण तुम्हांला मसणवट्यात
यायला वेळ तर मिळायला
हवाय ?
तुम्ही कसे छान गुंतला
असाल संसाराच्या रगाड्याला

तुमच्याच जिवंतपणाच्या
प्रदूषणाला तुम्हीच हुंगू
शकणार नाहीत

फक्त आठवणीत राहील
तुमच्या मैला मैलाच्या दगडांवर
मुतत जाणारे
एक गावठी कुत्रे.





## पाचागणी

ह्या कपड्यान फारच
चोरासारखें वाटने

निष्कलंक आयुष्य डागडुजीचं
हे बत्ताशे गडंनेरानले
हे गजमल माळी खटमलातले
ही मानी ओशाड व्यभिचारानंतरची
हे बोढंग समुद्रधुणीनले
हे पुतळे माना लटकणारे
ही हरणे वधस्तंभावरली
ही माणसे स्मशानान जळणारी
ही स्मशाने परन घराकडे येणारी
पाचागणी




## सृजनखोर जर्दाळू

जरा झोपू दे,रे
साखरझोपेत
हे काय ?
मागच्या चापट्या लगावून
झोपमोड करणारास कोण तू ?
कोण तू ?
कोठून आलास ?
का त्रास देतोस वृथा ?

मराठी ग्रंथालय ठाणे
२०३५
२३००२
काव्य
१५।७।०२
शाखा (स्थळ

काय ?
तु तु मी मी आहे
काय, तु माझीच प्रतिकृती आहेस ?
माझा विकार
माझा विचार तु-मीचे हे लफडे
वाहव्वा, वाहव्वा!
कोण तु? माझा आत्मा वगैरे
वा, वा! छान ओळखतो मी तुला हं!
अरे,
कालच नर तुला झवून सोडले ना मी ?
अब चल, सिधी कल्टी खा ले
मेरी खिडकी को नकलीफ मन देना
वरना अंगार मून जाऊंगा
जरा कोई अच्छा घर धूंड ले
सनोतनी खानदानी

चिमण्या सैल होऊन सकाळ आळवतायेत
कावळे शुचिर्भूत होनायन
सर्व शहराचा वाद्यमेळ जमून आलाय
दारिद्र्याच्या भूपाळीचे स्वर् रुणझुणनाहेन
वेडझव्या! आवशोक दाखव, नाहीतर बापाचं श्राद्ध कर
उगाच धसमुसळेपणा नको सनगाशी
ह्या रामप्रहरी
उगाच खटखट कशाला ?
ईश्वर नश्वर नंदीच्या अंडासारखी
सृजनखोर जर्दाळू
आत्म्या, चल फूट भडव्या!
नसती, साली, ब्याद! चाय कम



# कामाठीपुरा

कॅलेंडरला हेपलून
कित्येक शतकांचा उपदंश देहावर मढवून
निशाचर माळिंदर पहुडलंय इथं
दिसतं कसं लोभस करड्या गुच्छासारखं
स्वप्नातच अविरत दंग दंग

मनुष्य झालाय मुका
त्याचा परमेश्वर बुळगा
या पोकळीला कंठ फुटेल काय ?

हवं तर लोखंडी डोळा निगराणीवर ठेव
असेल. तर त्यातलाही अश्रू गोठवून ठेव
त्याचं छकडं रूपडं पाहून सुटतो ताळतंत्र संयमाचा
ते खडबडून होतं जागं
बोचकारत कोटरी फण्यानं जिव्हारी
ते जखमा करून मोडतं आरपार
रात्र होते उपवर, तसतशी जखमांना फुटतात फुले.


फुलांचे पसरतात समुद्र नितांत
नितांताचे नाचत राहतात मैथुनमोर

हा नरक
हा गरगरणारा भोवरा.
हे ठणकणारे कुरूप
ही घुंगरणारी वेदना

ढाळ, ढाळ, अंगावरली कात एकदा मुळापासून!
सोलून घे स्वतःला.
हे विषाक्त सनातन गर्भाशय होऊन जाऊ दे निर्देही.
या ढिम्म मांसाच्या गोळ्याला
फुटायला नकोत अवयवांचे धुमारे
हे पोटॅशियम सायनाईड
घे, घे चव याची!
क्षणाच्या कितीव्या तरी भागावर मरताना
लिहून ठेवं अभिप्रेत होत जाणारा निम्न रस.

गोड किंवा खारट
विषाची चव घेण्यास झुंपल्यायत इथं रांगा.
शब्दांसारखे इथे मरण देखील आले आहे भरून
बस्स, थोड्या वेळात इथे मरी कोसळू लागतील

कामाठीपुरा
सर्व मौसमांना बगलेत मारून
तू फतकलास चिखलात
या छिनाल सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन
मी पाहतो वाट तुझी कमळ होण्याची.
—चिखलातलं कमळ.



# पिलाहाऊसचा मृत्यू

तसं या शहरात काहीच लपत नाही

तू गेल्याचं कळतंय/  जरा आणखीनच वाटतंय


तुझ्या आयुष्याला पेलून धरणारी ही तीव्रतर साडेसाती
आज मलाही आनंद होतोय, की तु तिच्याही पुढे
निघून जाऊ शकलोस.
तु एक गुरुपौर्णिमेचा चंद्र
ह्या अरब गल्लीतल्या मस्जिदीत सापडलेला
शैव-वैष्णवी भस्मासाठी तुला कपाळ होतंच कुठं ?
हे असं तुझ्यातल रहस्य

धड गाड उचलून नतमस्तकही झाला नाहीस
धड छातीची आ ाबोबीही खेळला नाहीस
धड अग्यारीतल्या झरतुष्ट्राच्या गजकर्णालाही
दोरी आवळली नाहीस
हे धर्मातीता,
धर्मवादी गांडुळांना निवान्त रवंथ करायला लावणारा तु
पराचा कावळा

डुकराचा हमामा तु कधी केलाच नाहीस
एखाद्या पोपची लघुशंकेची करंगळीही चोरली नाहीस
सर्व कसं जागचे जागी
रचून ठेवलंस तु मचानभिंती

मेलाय, म्हणात, तु
तु तर मेल्यासारखा वाटत नाहीस अजून!
वाटतं, नाक्यावर पान खायला गेला असशील
बनारसी तीनसे, राजरतन किमाम, शेकेली सुपारी


हे आपल्या सुखदुःखाचे अवघे ओरिएंटल




कबाब आणि नांद
खिमा आणि ब्रेदा
बायरनच्या बायका / मर्ढेकरांच्या टांगा
गालिबच्या गझला / जॉनी वॉकरच्या नकला
रुखादी मराठमोळी अंजनाबाई मगर
रुखादा नर्मदेचा गोटा-अरविंद गोखल्यांसारखा अनामिक
फेकमफाक शाळिग्राम
पारश्याच्या विहिरीनली प्रेतं पाहात पाहात
कम्युनिस्ट कुमुद मेहताच्या घरी तिच्या ऐश्वर्याचा
Morning tea घेणारा येडझवा ज्ञानेश्वर नाडकर्णी
रेवजी वॉ डोळम / ढोरचाळ / पठ्ठे बापूराव
डेव्हिड वॉ / कश्मीरी लाला / सफेद गल्ली
आणि कितीतरी गोष्टी
सिफिलिस वादळांच्या पलिकडून येणाऱ्या शंकर-शंभूच्या
आवाजासारख्या
चायनीज बागा आणि वखारीचे भंगार अंगूर
उडनखटोले / भटोरे / बांगडीवाल्याचे

दयेची धून तिचा तिरस्कारच वाटत आला आपल्याला
आपण तिच्या नावावर काहीच डिपॉझिट केलं नाही
मात्र सुरक्षिततेचं पातंसुद्धा
आजही तुझ्या आज्ञेवर वारा चालतो
दारूची बासरी दशकाला मारून टाकते
सिग्नलही तेच आवडती नावडतीचे
आयुष्याच्या लोंढ्याला रस्ता करून देणारे
आणि गाणं म्हणणारा
आनंगी दादू इंदुरीकर
हे गजवदना : वदना

नाचत ये रणांगणा
नाचत ये रणांगणा
तोड वैऱ्यांच्या माना!'
इराणी तर इथले जाऊच लागलेत
पारश्यांच्या हॉटेलांचीं परमिट-रूमं होतायत.
चिनियांनी तर दिल्लीचे दरबारच उघडलेत
सिंधी तर चक्क नाईट-क्लब चालवताहेत
दाऊद, साबिर / मेहमूद कालिया
अमीरजादा आलम आणि जेब
सर्वत्र द्वेष सूड मत्सर गँगस्टर्स
गिलोटिनच्या अंगावर नवथर हळद
ओमरशेरीफ रोजच तिचा दादला होतोय



दरोबस्त संध्याकाळी मी इथं आता एकाकी येऊन बसतो
नाचणारी पवळी / पठ्ठे बापूराव
एखादं लाडिम
एखादा रमीचा खेळ
किंवा
'मुंबई नगरी बडी बांका
जशी रावणाची लंका' गुणगुणणे
काहीच जुळून येत नाही
तुमते शब्दांचे नाकतोडे नाकच चावू लागतात
तुझ्या आवाजाची जुळणी करायला लागतो,
तर तूही निसटतोस
सटफटांग मनमौजी
'पिंजरा रहेगा खाली' म्हणत
हे असं मरत मरत राहायचं इथं
सौन्दर्य दुःखातलं / छळातलं / झळांतलं
क्रांति मैदान ते माझगाव




आज ट्रामचे रूळही लापता झालेत
आणि तुझे मनमनाटी मुखपत्र बंद करून
सिमेंटी कुबेर व्हायला निघालेत.


तुझ्या रेनाची, तुझ्या वासाची आमची सवय
मोडणारच नाही कधी
हे साहेबी
**Play House** च्या
पिलाहाऊसा!

आजपर्यंत आमच्यासारखाच जगलास तू तिसरा, चवथा दर्जा
इंग्लंडच्या राणीने हापूसच्या चाखलेल्या माली
अजूनही ह्या फूटपाथवर पडल्यायत
आणि ते तुझं मुतुमुतू बालपण

कलेच्या देवतेचं सर्व अनंगरंग अभिव्यक्त करणारा सत्यजित रे
तुझ्याकडे यायला निघालाय, रे
त्याला करायचेय चित्रबद्ध तुझ्या बालपणाचे चित्र
माणसांच्या फिल्मोन्मवान ते त्याला **भलतीच** दाद
देऊन जाईल.
त्याला तर आत्ता त्याच्याही
पोकळीची जाणीव झालीय
आणि त्यात तू असा, गाढवा, प्रौढ होऊन निवर्तलायस

कधीमधी तू जर आलास या ठिकाणी,'
तर मुंबईनगरी बडी बाका पाण्यानं गिळलेली असेल समुद्रसुप्त
आणि शेज सुईणीनं
धुऊन टाकली असेल – एक अपसार
कापलेली नाळ, म्हणून





# संत फॉकलंड रोड

अकलेचं भजं झालं, की माणूस सन्त वगैरे बनतो
जसे : 'जे का रंजले गांजले / त्यांसी म्हणे जो आपुले
आपुलेच बोट घालून / आपण किनी हुंगायचा वास ?
आपुल्याच गदळ नरकाचा ?
किनी विनाकारण इंचरायचा गुताडा
लिखा, उवा आणि बुवा.
आपुणच व्हायचे आपुलेच ढोलके-दोन्ही बाजू बडवून घेणारे

ढोल / गवार / शूद्र / नारी
सब ताडनके अधिकारी'
हे सन्त फॉकलंड रोडा,
ही आमुच्या आयुष्याची वेळ तुझ्या डोळ्यात दडलेली
हा आमुचा वेदनेचा चेहरा तू असा पुन्हा पुन्हा
वर का आणतोयस ?
कलगी-तुऱ्याची भांडणं करण्याऐवजी
तू सरळ सरळ रहस्यालाच भिडतोस
हे आम्हांला आवडते
तू एक खेळिया / दोन घेणारा, दोन देणारा
प्रत्येक हार ही उद्याची जीत आहे
हे देहाधडया शिकवत आलास तू
/ पैल तो, गे, काऊ कोकताहे
अपशकुन, गे, माये सांगताहे
यापेक्षा हे कित्ती कित्ती तरी चांगले


पर्वा देहूला गेलो होतो
माझ्या गावाहून आठ-दहा मैलांवरच ती
मायंदाळी बदललेली
फूड कॉर्पोरेशनची गोदामं / लष्कराच्या छावण्या
आर.एस.एस. वाल्यांची गावं / मराठी मायनांची दादागिरी
बाजूला गो. नि. दाण्डेकरांची दाढी / आणि या सर्वांमधून
धावणारी ट्रेन / **Bombay Poona up down.**

अलीकडे, म्हणे, इंद्रायणीतल्या माशांनाही तुझ्या
अभंगाचं अजीर्ण व्हायला लागलंय.
तुझ्या गावचा चेहरा हा असा
प्लॅस्टिक सर्जरी करणाऱ्या देवानंद सारखा
EVERGREEN देहूला तू सोडून सगळीच भेटली
नात्यागोत्यांतली त्यात तुही आयपण व्हती
पटापटा मुकं घेतलं तीनं माहं
तुह्या लोभापाय मीही पायाला शिवून घेतलं तिच्या
तुह्या बायकोकडं पाहायाची हिंमत झाली नाय
गांड फाटायला लागली.
नंतर पुढं तुही चौकशी केली तुह्या आयकडं
'म्हनलं अलीकडं तुकारामाची काय खबरबात ?'
म्हातारीनं कचाकचा शिव्या दिल्या तुझ्या नावानं
कडाकडा बोटं मोडली / अस्ताळली पस्ताळली /
म्हनली, 'झवनं बेरशी निघालं'.
'दुभती म्हैस हानाळायला दिली, न अभंगच लिवीत बसलं
अंगावर चिमूटभर मास असावं लागतं गरिबांच्या
मंग लागावं अभंगाबिभंगाच्या नादी
नुसतं अभंग अभंग / टाळ कुटनं
लय कावून गेले नि दिला हाकलून

म्हनलं, अभंग बिभंग गेलं खड्डयात
अभंगाचं जेकाय आसंल, ते पाहून घेईल इंद्रायणी!
त्या दिवसापास्नं सवनं जे गायब हाय,
ते नजरंच पडनाय कुठंयबी
कुणी म्हंन्यान / खळ्यात हाय
कुणी म्हंन्यान / मळ्यान हाय
कुणी म्हंन्यान / गुरवळ्यात हाय
कुणी म्हंन्यान / माऊलीच्या देवळात हाय
कुणी म्हंन्यान / दुकान बी हाय

वय वाढतं, तशा चामड्याला सुरकुत्या
पडतात, म्हश्या गज्या,
म्हनलं आत्ता तुक्याची गोठ टाकावी कानामागं
आणि संभाळावीन आपली नानवंड / परनवंड
दररोज तुक्याच्या नावानं टाळ तरी कसंर कुटायचं ?
त्यापरीस आप्लं खुरं घ्यावं
आणि उकिरडा चाळत बसावं.
तेव्हढा पिकाला आधार तरी व्हईल!
आता आलाच तुक्या परतून चुकून घराकडे,
तो त्याला म्हणणारहे मी
–की, बाबा, आलं, ग्यालं इंद्रायणीला मिळालं.


देव आन देवाची भानगड अस्नी बोंडीच्या भोकामागंखी
सुतून झालं, की आपून गप्प बसावं
आत्ता सर्व नाद सोड.
घुंगरं बांधलेल्या आवासुदीक बदलतान
तु त नरवच्चा आहेस
सरळ, अभंगाच्या झोळ्या उचल नि मुंबैला जा.
मस्त फॉकलंड रोडाकडं.



मायंदळ धंदा व्हईल
पोटपाणी पुन्हा पिकंल
पर गाभरू आजून यीनाच घराकडं
फॉकलंड महाराज,
सारखं कागुद धाडत्यान
–कि तुक्याला बेगीनं पाठंवून द्या.
त्याला पकडाची दीक्षा द्यायची
कॉस्मोपॉलिटन प्राकृनाची
लय गावंढळ व्हायला अजून बिचारा
त्याची दीक्षा झाली, की त्रिवार आनंदाची गांडमुळं
उभी राहनील रस्त्यारस्त्यांनून / वस्त्यावस्त्यांनून
बेवारशी चेहऱ्याला पुन्हा पुन्हा डिवचन किनखापी
बेवारशी मुंबईवर मावली धरन.
वेदनेच्या चेहऱ्याला पुन्हा पुन्हा डिवचन किनखापी
मुक्री कॅमेऱ्याच्या पोटान गर्भघट्ट होन जाणारी
असूर्न समुदायासारखी / सोबत
सन्त फॉकलंड रोडच्या नव्या शिष्यासाठी
वद / गर्मी / परमा
नासूर
आणि आणखीन माणसांचे जे जे काही सर्व असेल, ते

बोला
पुंडलिकावर देव हार डहल,
श्री ज्ञानदेव तुकाराम
मंडळी मुनली, मोऱ्या.
धन्यवाद.
सन्त फॉकलंड रोडा!
या १९८१ सालान, तुझ्या निमित्ताने का होईना,
मला अक्कलदाढ यायला लागलीय.





## मौलाना भेंडीबाजार

हे अल्ला,

किमान या नास्तिकांच्या थाळीत तरी जेवून जा!

हा जमाना का म्हणून आम्हांला खतम करत सुटलाय ?

कुणीतरी रहेम करेल या झुंडीवर ?

'मनमखाना'...

या सनमखान्याच्या पायी

ही उमरकैद कशाला ?

भलाई – तीही दीनदुनियेची

ही कल्माची पानं किती चघळावीत ?
किती ग्रंथ करावी मंथ त्याच त्याच चोथ्याची ?
हा भागी पत्थर
किती घासाव्या पाठी त्यावर ?
'नशीब' - तेही किती मोजावे बोटावर ?
सुलेमान हलवाईवाला
गुलशन फुटवेअर
पाहता पाहता हे उगवलेले खाद्याचे चंद्र / 'अर्धचंद्र'
हे अल्ला,
हा तुझ्या शरीरातून दरवळणारा नानकटाईचा वास
जन्तू / जीवजन्तू
ह्या मुंग्या कुणाला चालल्यात ढकलत ?
ही निष्ठेत राहणारी आयुष्ये
काय ठेवणार नावा ?
काय करणार तोबा ?
यासाठी
या बाहुल्या पसरत जाणाऱ्या बांगेच्या हाकेवर हुकूम
कुजत जाणाऱ्या देहासाठी म्हणू या पायन्दावाद
किमान ही रंडीबाज हुकमत बाळंत होण्यासाठी
हे भेंडीबाजारा,
गुन्हेगाराचं शिक्कामोर्तब तर केलंच होतं तुझ्यावर अगोदर
आत्ता काफिरांच्या यादीत तरी स्वतःला सामावून घे

अरे,
इथले सर्व धर्मसंस्थापक असतात मवाली, खुनी
आता
या मजहबी अल्लाची ही कमाई तरी जोखून दे !
उगाच कशाला हवाय नुसताच शब्दांचा पाऊस
आयुष्याचे दरवाजे मोडत जाणारा ?




# प्रियंकर

ते पृथ्वीच्या रहस्याला जाणत नाहीत
ते ओळखून आहेत, तरीही आश्चर्यचकित स्वत: बद्दल
हे अशक्यपण त्यांच्यापर्यंत कसं येऊ शकेल ?
त्यांना तुम्ही सांगा - एका आठवणीतून दुसऱ्या आठवणीत
जाताना नेहमीच खांडावी लागते नाळ

हे सावळतीच्या दु:खातलं सामर्थ्य
सुखाबद्दल संशयच घेत आलो आपण नेहमी
दु:खाला खांद्यावर घेऊन
ही एक पायासून वेदना हिंस्र / क्रूर
ही शस्त्रं परजीत आपण वळणावरून वळतो आहोत


'अस्पृश्य' म्हणून आपण नाकारू शकत नाही
आपलं एकमेव संघटित आयुष्य
हे शिकारे आणि ह्या शिकारी
ते ह्या अवकाशाला गिळंकृत करू पाहताहेत
हे अवकाश आपल्या आयुष्यापेक्षा व्हायला लागले लहान.
आणि हे आपले काळेसावळे कृष्ण
करताहेत आदिमनवासी नृत्य
ह्यांच्या अस्खलनृत्यात देखील रुणझुणपैंजण
ही माती ह्यांच्या पायांशी चुंबन घेणारी
प्रियंकर / नव्या नवरीसारखी कंदमूळ लज्जागौरी




# भूक

१


भूक,
एकच करता आलं नाही आणि आलं
प्रमेय मांडवणं न मांडवणं
भुकेच्या आगीची कविता होईल ?
भुकेच्या आगीत संगीत मारलं जाईल ?
ज्याला स्वतःच्या नाडीचेच ठोके मोजता येत नाहीत,
त्याला संगीत दूरपास्त
भूक, भांडवलाच्या गायनाबद्दल
बिदागी मागितली जाईल, असं आम्हाला वाटलं नव्हतं




भूक,
एक निष्फळ गोष्ट
कितीही मेहनत केली, तरी पदरात दगडच पडणार
दगडांचं घर बांधता येत नसेल,
तर त्यात राहणं आपल्याला जमणार नाही
भूक, तू कधी उंदीर होतेस, कधी मांजर, कधी सिंह
तू आरंभलेल्या खेळास
आमच्यासारख्या पामरांनी किती सामोरं यायचं ?




भूक,
धूर्त शांततेची होते वाढ सर्वत्र
हा आमच्या नवीन जन्मठेपेचा दिवस आहे
भूक, माफ कर
आम्हांला वेळेचं झाड
छाटता येत नाही, म्हणून
ते छाटलं, तरी आकाश निळंच राहील
कुठल्या बाजारात मूक ह्दय घेऊन जावं ?
त्याचा लिलाव मांडावा ?
जिथं दिवस झाडतो आयुष्य
तिथं विकत कोण घेणार चिरडून गेलेलं ह्दय ?
कुणाला फायद्यात पडणार त्याचा व्यापार ?





भूक, तू तुझे डाव मांड, डावपेच मांड
जर होता आलं आम्हांला हिकमती
तर आम्ही तुझ्याशी निकली कुस्ती करू इच्छितो
किती सरपटत रहायचं सर्वांगभर तुझ्याबरोबर
भुकेवरला मळ किती धुवायचा ?
वर्षावरली धूळ किती धुवायची ?
किती तिरस्कार करावयाचा तिरस्काराच्या सरहद्दीचा ?



भूक, तुझ्यात नि आमच्यात जर जोडला जात नसेल
लोखंडी पूल,
तर आम्हाला निर्व्याज पाखरासारखं उडून जाऊ दे

भूक, तुझी जमीन, तुझ्या जमिनीवरले काटे
सतत राहतात रात्रंदिवस मेंदूत
शेवटी शेवटी मेंदूच होऊन जातो फ्रीझ
भूक, फ्रीझमधली चीजवस्तू बाहेर काढताना
ती ताजीच असेल का ?
भूक, तुझं रक्त रक्त थंड
भूक, तुझं रक्त रक्त मूक.
तू हुकूम दे–आतड्यातून खेळू दे वीज.
तू हुकूम दे–आयुष्य होऊन जाऊदे चार्ज
दुखावलेला समुद्र आणि दीर्घ रुदन आमच्या मागणीचं
भूक, तू आमची मागणी मंजूर कर
तू किनाऱ्यावरल्या बेवारशी झोपड्यांना मालवू नकोस
नंतर पाहू आपण दुःखाची गोगलगाय
आणि समुद्र
यांच्यामधला जरतारी संघर्ष

भूक,
आम्ही आमची मागणी केली आहे
आमची भुरळ तुला पडू दे
आम्ही रुजणारच नाही का ?
आम्हाला रुजू दे
सूर्य खुशाल विसरला असेल पहाट
नदी खुशाल विसरली असेल वेळ
प्रकाशाकडून आम्हांला आयुष्यापेक्षा
जास्त काही मागायचं होतं
प्रकाशच निघाला खोटा

भूक,
दराच्या खांबांना आम्ही आमच्या दारात
स्थितप्रज्ञासारखे उभे करणार नाही
आम्ही किती आभार मानायचे
दुःखाचे
दुःखामधल्या संगीताचे ?
प्रपंच जर आम्हांला मांडता आला नसेल नेटका,
तर अम्हाला काय अधिकार फुलांशी झगडण्याचा ?
दुःखाला किती चेतवायचं ?
किती जळत रहायचं ?
जळत राहणाऱ्या ज्वाळाला किती पकडायचं ?
या सूर्यस्रावामध्ये जर दृग्गोचर होत नसतील
आमच्या संज्ञा
तर हरलेले सैनिक म्हणून आम्ही तुला सलामी देतो.
कुणी सांगितलं...
फौजेमधले सर्वच सैनिक मर्दासारखे लढतात, म्हणून ?




४

भूक,
आज आमच्या घरात एकही दाणा नाही
आज आमच्या घरात एकही शहाणा नाही
भूक,
अंतःकरणातल्या शेवटच्या दिव्यापर्यंत गायले, तर
भुकेचा दिवा मालवेल काय ?
भूक, तुला आता जपले, तर अंधारेल
भूक, तुझा शृंगार और
तुझ्याशिवाय कुठलीच अवदसा येत नाही
आमच्या वाट्याला
भूक, तुला जर भोगता आलं नाही,
गर्भार ठेवता आलं नाही,
तर आत्महत्या करावी लागेल आमच्या जथ्याला
भूक, आमचा एक्का पक्का
छक्क्यांच्या संगीताबद्दल आम्ही कशाला बोलू ?
आमचा पुरुषार्थ तुझ्या रमेत आहे
बघू कोण जिंकतं, तू – की आम्ही !

५

भूक,
झाडं आधी, की बी आधी,
भूक, सगळा प्रश्न तू गहन करतेस
भूक, एवढंच सांग, की हे माकड कुठल्या वंशाचं आहे
जर सांगता येत नसेल तुला
तर आम्ही तुझ्या सतरा पिढ्यांना झवतो—
भूक, हात तुझ्या मायला आम्ही....




## स्वातंत्र्या

स्वातंत्र्या,
आम्ही जन्मलो फक्त तुझ्यासाठी
जन्मलो नि जखडलो
दास्याच्या बेड्यात

किती ठेवावा तुझ्या
इल्लीस मर्जनावर विश्वास ?
जन्मतः च तू ठेवलेस आमचे अवयव अधू
बनवलेस आम्हाला जाणूनबुजून लुळे-पांगळे
परावलंबी
दुःखी कष्टी
एक चिरंजीव वेदना तू सतत
स्रवत ठेवलीस आमच्यात
तू
नुसता ढिम्म पुतळा आहेस
नुसता दगड आहेस ।


देईल दाता
खाईल प्राणा
किती म्हणावं म्हणावं
थुई थुई नाच माझ्या अंगणात, मोरा
निळ्या निळ्या पिसाऱ्याचा फुलव पिसारा

तुझं गाणं गोजिरवाणं
पुरे झालं आता, पुरे झालं तुझं नाटक



तुझ्याविरुद्ध नकार करून आम्ही थकलोत
कान असून तू बहिरा आहेस
डोळे असून तू आंधळा आहेस
तोंड असून तू मुका आहेस
मर्द असून तू बुळगा आहेस

आम्ही जंगली माणसं
दगडानं ढोचा पुसतो नि दगड फेकून देतो
या नागरी संस्कृतीत
त्यांनी खुशाल फासावा तुला शेंदूर
चढवून घ्यावं त्यांच्या लेकीबाळींनी तुला उगवर
खरंच, रे, आता आम्ही फार थकलोत.
आमच्या खवळलेल्या हृदयाला विश्रांती हवीय
आमच्या आयुष्यात
तू थोडीच शांतता नांदू देणारेस ?
काळ्याशार वेदनेचं तू दिलेलं बक्षीस
ही तुझी क्रूर पकड
धड जगूही देत नाहीस
धड मरूही देत नाहीस
आतातरी लावू दे ना
ओठाला विषाचा पेला
हे धंडा
हे दगडा
ये!
ये!
असा जवळ ये
भिडव ना प्याल्याला प्याला
म्हण







चिअर्स, माय डिअर!'
मिसळू दे विष आमच्या रक्तात
रक्तात पसरू दे अंधार
अंधारात पसरू दे मरणकळा
फुटू दे थकण्याचा काळ
आता किती काळ सरपटत राहायचं ?

बघ
बघ
तुझ्या घराचेही वासे फिरायला लागलेत
हसू दे मनमोकळं
याही अपंग अवस्थेत
उरकून घेऊ दे मला
तुझ्यावरली शस्त्रक्रिया
नि उरखून करू दे तुझ्यावर
करू दे
आयुर्वेदिक अभिषेक
अनेक झाडंझुडपं फुलू देत, फळू देत
व्यभिचार होऊ देत
अनेक पतिव्रता गाभण राहू देत
अनौरस संतती वाढू देत

हे स्वातंत्र्या, तुझ्या रंडीला वांझ ठेवू नको
तिला आमच्या खाली निजू दे
तिची कूस उजवू दे
हे स्वातंत्र्या,
हे दगडा,
हे बुळग्या, हे शेंदराच्या मालका,
फक्त एका नियोगाची मला संधी दे!





# तुही इयत्ता
# कंची
# तुही इयत्ता


तुही यत्ता कंची,
तुही यत्ता ?

हुमान घालू हुमान
टनटना उडावलं
मान हान बुडावलं
मांग ना मांग
भुकंल्ला कोंडा — निजंल्ला धोंडा
केल्लाम्य का ?
इटाळान वाईल्ला अवल्लाम्य का ?
पडं वहल्लं का ? पडं ?
निम्ना घाम्यला का ? निम्ना ?
हयाळं म्हंजी काय ? हयाळं ?
पागखांड म्हंजी काय ? पागखांड ?
चान्या वाळवल्या का ? चान्या ?
फाम्यी खाल्ली का ? फाम्यी ?
गुडमं टोकल्लं का ? गुडम् ?
चुनचुन्या तळल्या का ? चुनचुन्या ?

आमं ख्येळावल्लं का ? आमं ?
मुकं घेनल्लं का ? मुकं ?
भ्वाँक लिपल्लं का ? भ्वाँक ?
शाम्नं मुजवल्लं का ? शाम्नं ?
गाभाडल्लाम्य का ? गाभाडल्लाम्य ?
वगवल्लाम्य का ? वगवल्लाम्य ?
डुनावल्लाम्य का ? डुनावल्लाम्य ?

तुला लई फटा

तुही यत्ता कंची ?
तुही यत्ता ?



आंबेडकर : १९७८
EQUALITY FOR ALL
OR
DEATH FOR INDIA

यानंतर काहीच दुर्बोध
लिहायचं नाही
कवितिक वळणं आडवळणं
घ्यायची नाहीत
गोता खायच्या नाहीत
जमीन असेल नसेल.
सरळ सरळ मुळालाच हात घालायचा
हा देश नुसताच
एरंडासारखा वाढत राहिला
त्याच्या फालतू विद्रूप पानांवर

आपण अकारण लठ्ठ झालो
लाळ गाळत राहिलो
नाग खेळवत राहिलो

प्रेमाचे प्रतिदान ते देणारच नाहीत
ते स्वत:साठीच एक वंचना आलेत
लचकन तोडावा स्वत:च्या मांसाचा गोळा
चकक भळभळत ठेवावा रक्ताचा धो धो मुसांडा

अहंकाराने पेटलेत ते
विकृतीने पछाडलेत ते
हत्या, हिंसा, रक्तपात
एका अपरिहार्य दुर्गंधीने ते विटाळलेत
ते वनवनात प्रत्येकाला इडिपस
त्यांना हवीय फाळणी
त्यांना हवाय दंगा

त्यांना माणसांना बनवायचंय हैवान
पुन्हा एकदा माणुसकी गेलेली पाहायचीय त्यांना
रक्त आणि हाडांचे सांगाडे
त्यांना गायचंय स्मशानगीत.
त्यांची माती / त्यांचा मेंदू / त्यांचं भोक
त्यांचा रंग / त्यांचं रक्त /

तेच तेवढे आईच्या उदरातून आलेत ?
बाकीचे कुत्र्या-मांजरांच्या !
किती भ्रमात जगतायत ते
किती विकारांचे दास बनतायत ते !
लालसा आणि तहान
कसं कोसळत चाललंय त्यांचं मनोरथ !
जीवनाचा त्यांनी नाकारला आहे स्वीकार
तोंड वर करून ते थुंकतात आभाळावर
आभाळ थोडंच त्यानं कलंकित होणार ?
काळं झालं आहे त्यांचं तोंड
दुसऱ्याच्या पावित्र्याची निर्भर्त्सना केल्यानं
त्यांचं पाप थोडंच कमी होईल ?

आता त्यांनी थांबायला हवं
आता त्यांनी बदलायला हवं
दुसऱ्याच्या डोळ्यात कुसळ शोधण्यापेक्षा
स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ दूर सारावं

पुतळ्याच्या अधिष्ठानापासून
तू किती तरी पुढे गेला आहेस
देशाच्या नावापेक्षा तू किती तरी मोठा झाला आहेस
तू कधीच उबवली नाहीस खुडूक कोंबडीसारखी अंडी

महाचिंतक तुझा प्रवाह
परिवर्तन करून गेला आहे आमच्या जीवनात
सत्याला आता डावलून कसं चालेल?
त्यांच्यासारखं बनायचं ज्यांचे प्राण प्रकाशित आहेत
त्यांच्यासारखं बनायचं-जे गर्दसावलीसारखे विश्रब्ध आहेत.
आतला आवाज हे खरं प्रामाणिकपण

तू हटवादी नव्हतास
तुझा दृष्टिकोण विशाल
तू वाकवलं युगाला शेंड्याबांड्या मोडून
जे होतं दुराग्रह, असाधारण, ते टाकलंस तू
आमच्या पदरात
तू आमच्या समोर नळपत रहतोस
तू दडवलं नाहीस गुपित
माझं आयुष्य होतं स्फटिकासारखं स्वच्छ,
जे उधळत गेलं मृत्यूच्याही पुढं

सर्व दलितांसाठी तू केंद्रपुरुष आलास
जे तुझ्याविरुद्ध बोलले,
ज्यांनी तुझ्या कामाची टिंगल केली,
त्यांच्यावर तू झाला नाहीस रुष्ट
त्यांच्या चुकीच्या भूमिकाविरुद्ध
तू पहाडासारखा उभा राहिलास
गुरुत्वाकर्षण हरवून बसलेल्या पृथ्वीच्या देहात पाय रोवून
जी कठोरवचनं पडली तुझ्या मुखातून बाहेर
त्यांचा उद्देश होता माणसांच्या मुक्तीचा
ज्या हृदयात तू सांठवलीस सहिष्णुता,
त्याच हृदयात जागवलास तू ज्वालामुखी विद्रोह
तुझा विद्रोह नव्हता अज्ञानी आंधळा

तो होता स्वत:ला बदलण्याचा जग बदलविण्याचा
नवे डोळे, नवे हृदय
दहशतीपेक्षा तुझा विश्वास होता जागृतीवर
तुझ्या जागृतीचा आधार होता अभ्यास, सेवा

तुझं नाव नव्हतं खोटं
तू उखडलेस मुळांसकट वटवृक्ष
शस्त्रे
तू उगारली नाहीस पोट भरण्यासाठी
ती उगारलीस जुलमाविरुद्ध
ईश्वराची तू केलीस शवचिकित्सा
सटवीचं कापलंस नाक
केलंस नकट
पापपुण्याच्या/ स्वर्ग नरकाच्या भाकडकथा तू
बुडवल्यास गटारात
तेहतीस कोटी बिंदचाट्यांचा तू फोदा केलास उदास
लावलीस पाण्याला आग
तुझा आवाज हुकमी
तुझ्या हुकुमावर कोसळायचे आकाश
चालायचे ऋतु जरतारी मार्ग आखीत
तू जगाशी भांडलास
विस्तवाशी खेळलास
वादळात तू दिलंस संगीत
दु:ख
दु:खाचं कारण.
दु:खापासून मुक्ती
मुक्तीचा मार्ग
परित्यक्त जमिनीवरही तू लावलीस माया
अप्रिय व्यक्तींचा संसर्ग


प्रिय व्यक्तीचा विरह
इच्छिलेलं मिळोन मिळणे
या सर्वांचा अर्थ; दु:ख
जन्माचा अर्थ; दु:ख
म्हातारपणाचा अर्थ; दु:ख
रोगाचा अर्थ; दु:ख
मरणाचा अर्थ; दु:ख

संघर्षाच्या उत्तराधिकाऱ्या,
ऱ्हस्व-दीर्घ गोष्टींना अन्न देणाऱ्या
माणसालाच तु बनवलंस पारदर्शी
आम्ही पाहतो प्रत्येक माणसातून पलीकडे ।

ते समजतात माणसांना ढोर आंधळे
ते समजतात माणसांना नीच
ते समजतात माणसांना लाचार
ते माणसाच्या छायेला घाबरतात
ते कवच पांघरून वसतात स्वत: भोवती
ते स्वत; च्याच अंगावर चढवून घेतात वारूळं
घुसमटतात, चरफडतात, गरळ ओकतात

यानंतर काहीच दुर्बोध लिहायचं नाही
फक्त फिरवायचा या सर्वांवरून गाढवाचा नांगर

EQUALITY FOR ALL
OR
DEATH FOR INDIA
-आणि हृदयावर कोरलेला
आंबेडकर : २०.७८



## आंबेडकर : ७९

हे आर्य चालीनले तुझे अनुयायी

कंठाला लंगोट बांधून डिंग्या मारतात
मातृगमनी यांच्या परंपरा
यम यमी व्यवाय
हे षंढ अर्जुन कित्येक वर्षांचे
अक्षतयोनीला छिन्न करणारे सूर्य यांच्या रक्तात.

खदखदणारे रसायन इथे
कोण टाचणीने त्याला फोडणार?
हा खिन्न उदास पाऊस निघाला आहे कुठे ?
या शहराला कुणी आग तर लावून जाणार नाही ?

मरणा तुझे मानले असामान्य
ते सामान्याच्या नजरेतून पाहिले
तुझ्या मरणाने शोकही झाला नाही, आनंदही
मरणापूर्वीचाच माणूस असतो खरा
बाकी नुसती धूळ आणि धुरळा.

मरणाच्या ठिकाणी मी प्रस्थापित करायला
निघालोय सौन्दर्य

हा भाकरींचा जाहिरनामा
हा संसदेचा रंडीखाना
ही देश नावाची आई
गजरेस निजते कुबेराच्या सोबत
काळ होत चालला आहे कर्मठ

मातीमोल होत चालले आहे हृदयातले चैतन्य
विझत चालली आहे डोळ्यांतली हिरवळ
आता पूजा तरी कोणाची बांधायची?

# आंबेडकर : १९८०

१

तु मेलास, म्हंजे संपला नाहीस.
आमच्यासारखाच तूही झोपलास बायकोवर
पोरं काढलीस, पण वाऱ्यावर सोडली नाहीस
आम्ही वाढलो असे, तसे, कसेही
परंतु आमच्या मुलांना
तुझी माया डावलण्याची हिंमतच होणार नाही कधी
ॲकॅडमिशयन । टेक्नीशियन । पॉलिटिशन । सायंटिस्ट
फिलॉसॉफर
हे काहीही लावतील तुझा अन्वयार्थ
तू जगलास फक्त माणसासारखं
ना त्याच्यात नाटक होतं
ना नाट्याविष्कार
ना नक्कल, ना नकलाकार



आता हे सर्व जुनं झालंय,
की त्यांनी आम्हाला वरून पाणी वाढलं
आता हे सर्व जुनं झालंय
की त्यांनी शाळेच्या पडवीबाहेर आम्हांला बसवलं
आता हे जुनं झालंय
की त्यांनी विठोबाचे काळेपांढरे पाय
आम्हाला पाहू दिले नाहीत
आता ते आणि आम्ही सगळेच सारखेवारखे
या जगानला समाजवाद
या जगानला कम्युनिझम
आणि तुझंही सर्व काही

आम्ही लावलं आहे कप्याला
त्यानचं झालं हे ध्वनित
आपलीच सावली आपल्या पायांना झाकू शकते

२

तुलाही शिव्या देतो, परंतु
जीभ तूच दिलीस
तुलाही पाण्यात बुडवतो, परंतु
पाणी तूच दिलेस
तुझे काहीही केले, तरीही
तुझे काहीही करता येते
परंतु प्रश्न राहतो माझ्या इमानाचा
प्रामाणिकपणाचा
तू कोण आहेस ?
तू कोण होतास ?
तू कुणाचा आहेस ?

३


जमाना सर्व तुझाच आहे
तरीही तुझे लोक दुःखी आहेत
फकिराला पंतप्रधान होता येते इथं
परंतु सांगा - भंग्याला नाही.
खुर्चीपुढे संसदेची किंमत झाली आहे कमी
कायद्यापुढे रूढीची किंमत झाली आहे कमी
या सर्वांमध्ये एकच पाहिले
की तुझे ऋतुचक्र सर्वांवर बरसले सारखे
कुठेही झाला नाही तुझ्याकडून पंक्तिप्रपंच

४

शुक्रवारचा दिवस होता
उजळणीचं पुस्तक एक स्लेट

आणि एक दगडी पेन्सिल
आईनं हौसेनं आणली बाजारातून

त्या दिवशी ती फारच थकली होती
चिमणीच्या उजेडात
तिने चेपून घेतले हातपाय माझ्याकडून.
नंतर ती म्हणाली,
'बाबा--मला डुलकी लागेपर्यंत
पाहून घे हे बुक
मी नाही शिकली सवरलेली
पण एक कर
शिक्शनाची सुरुवात
बा म्हणजे बाबासाहेबापास्नं कर.
गणपतीपेक्षा ते लईच सुंदर होते
म्हणून नको गिरवूस
श्रीगणेशा
गणांचा पती नसतो कुरूप
तो असतो माणसांतला
सत्यम् । शिवम् । सुंदरम्
सत्यम् शिवम् सुंदराला
म्हणतात बाबासाहेब आंबेडकर
बाकी या बुकाला काय बी आरथ नाही बघ.
'
हे सर्व लिहीपर्यंत रात्रीचे
तीन वाजलेयत
दारू पिण्याची इच्छा असूनदेखील
दारू पिऊशी वाटत नाहीय.
फक्त झोपावेसे वाटते शांत
उद्याची वर्णहीन सकाळ पाहाण्यासाठी



# आंबेडकर : १९८१

मान्सूनसारखा येतोयस आमच्याकडे तू
तुला वाट करून द्यायला हवी

कुठे नाहीस तू ?
उन्हापावसात / वाऱ्यावावधानात / भूतकाळात
गतवेदनेत / माझ्या डोळ्यांत / भुवयांच्या इंद्रधनुष्यात

स्वप्नांच्या प्रतिसादाला तडाखे देत
हे अस्तित्वाचे कांपोझिशन उत्तुंग करत


तुझे शेष / तुझे अवशेष
तुझे अस्खलित लख्ख लख्ख प्रतिबिंब
ते निघालेयत छिन्नभिन्न करत
दहशत
दहशत हे तुझे नाव कसे असू शकेल ?
ज्ञानाच्या पानावरेवर दिगंत आणि दूरतर होत जाणारा तू
क्षुद्र डोळ्यांच्या लफंग्यानी तुला क्षितिजावरच का बंदिस्त करून टाकावे?

यांना यांच्या गांडीवरचे नीळच सोसना येत नाहीत
उगाच शेमन्याचं तुनतुनं
अन बोच्याचा नाश यांनी का करावा ?
अभिसरणाच्या नावाखाली ह्यांनी अंगावर चढवलेली दौलतीची पुटे
शेवटी गधाबाई / भिमाबाईची करुणाष्टके
शेवटी परड्या यल्लम्माच्या/ हे चाळझोक बुलंडे
यांच्या पंचायती हमाल
हे यांचे गडगंज ट्रस्ट
हे यांचे अष्टौप्रहर सुग्रास शिबिरी जेवण.
नंतर रात्रीस स्वप्नांला सुरमा घालून सुग्रास झवणं.
पुन्हा नव्या दिवसासाठी शुभ्र खादी भांडार सुपर स्ट्रक्चरसारखे
आशुक माशुक
स्वत:चेच क्रूस
स्वत:च्याच खांद्यावरून वाहून न्यायला हलकट ठरलेले हे

इथे अज्ञान फळू दे, फुलू दे
दलितांना मात्र काही न कळू दे
ह्या प्रेषितांच्या टाळूवर लोणी गळू दे
हल्ली ह्यांच्या समाजवादी पिंडांनाही कावळे शिवू लागलेत
ह्या कावळ्यांनी सर्व शहरच घाण करून सोडलंय

हे गरवाडी आकाशा
तो आमचा सोयरा मान्सून येतोस ना आम्हांला चिंब करत!
हे पक्क्यापेशी सालाचे महाद्वार त्याच्यासाठी सताड उघडे
त्याच्यासाठी हे हृदय / त्याच्यासाठी हे रक्त
त्याच्यासाठी हे प्रेम!
स्वप्नांचे पडदे टरकावून सिंहनादात सामील व्हायला
सज्ज आम्ही आता भीती कोणाच्या बापाची?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2830
23402
का१०
२५।९।१२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)



REFBK-0023402

REFBK-0023402

## रमाबाई आंबेडकर

गजमाचीच्या घोड्यांवर
सर्वच सवाणी रमतात
आपल्या त्यागाची यशस्वी लुगडी वाळवीत.

त्यात कशा कुणाला खरंच घातलंय काय ?
माथं दुःखाच चिरगुटमुक्त
वाफेच्या इंजिनाबरोबरच चाके फिरतात गोलगोल पुढेपुढे
माणसाचे शापग्रस्त आरसे
होतात पुन्हा आरस्पानी नवे

आज तुझा एक अडगळीतला फोटो
माझ्या आठवणीत आहे.
मरणानंतरही मरणं मेल्यावर
तो कोण हिरावून घेईल माझ्याकडून ?
एक वेळ वाळवीला वाळवी लागेल
एक वेळ कसरीला कसर

फोटो तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा
चारचौघांच्या खटल्यासारखा
त्यात सर्वच आहेत; तू, तुझ्या नणंदा, जावा, दीर-
लष्करातले मामंजी.
पोरंबाळं आणि साहेब आणि टॉबी आणि निखळ कॅन्टोन्मेंट
पाठीमागे झाडाझुडपांचं ग्राऊंड

वर्षानुवर्षं पाहात आलोय हे चित्र मी
साहेब तर परमेश्वराच्या छाताडावर बसल्यासारखे आजही वाटतात
सुपारी कातरणाऱ्या टिळकांच्या आत्म्याला त्रास देत.
रमाबाई, ही सर्व पुण्याई तुझी आहे.
त्या फोटोत फक्त तूच आहेस.
तुझे चरित्र / तुझ्या खस्ता
तुझे अश्रू / तुझे उसासे / तुझे शहाणपण
तुझ्या डोळ्यांतले आदिअंताला स्पर्श करणारं कारुण्य

तुझ्या डोळ्यांतील ती निष्ठेची काळीशार पोत
तुझ्या चेहऱ्यावरले ते प्रामादिक औदासीन्य
कृष्णहातांच्या चटक्यांच्या कहाण्या सांगणाऱ्या बांगड्या
किती, ग, सहन केलंस हे!
अष्टौप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे!
सवतीमत्सर तुला कधीच आला नाही का ग ?

पैस पाठीवर घेऊन
पोरक्या ज्ञानेश्वराने
अमृताशी पैजा जिंकल्या
साहेबांच्या पाठीशी पैस होऊन तू
गुलामांच्या उद्धारच्या ज्ञानेश्वरीची
पहिली ओळ लिहायला मदत केलीस

इवके चाळीतल्या राजहंसांना
दगडी कोळशांच्या धुराची
तू लागू दिली नाहीस झळ
भांड्याला लागणारी भांडी
डोक्यानं फुटणारी डोकी
पटकी / मटकी
तू चंदनाचं मूल्य केलंस कमी
तुझ्या मुक्या मनाची गाणी '
कल्कीचा घोडा ह्या कलियुगात घेऊन फिरतो आहे
मराठी भाषेची रेसीनैसी करत

हे बहिणाईच्या बहिणाई,
मरण्यापूर्वी एकदा तरी तुझे
गाणे ऐकवशील काय?
या रांडाव मराठी भाषेला
पुन्हा सवाष्ण होताना पाहायचंय मला.

# या अखंड ग्रीष्मात

या अखंड ग्रीष्मात
आम्ही न्याहाळतो अदृश्य ओलाजर्द चेहरा
जो आमचा असून
आमचा कधीच नव्हता
त्यात उसळतं कारंजं तान्हुलं
आम्ही पाहातो त्याच्याकडे तहानेल्या नजरेनं
वर्तुळाकार संध्याकाळ,
पुष्कळ
कोसळते पागल होऊन
त्यात पुन्हा
कपटी शांतता
होत जाते घोटीव गर्भारणीसारखी
हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस
आम्ही आम्हालाच ओळखू शकत नाही अलवार
मरणाच्या निव्वळ भयाने
किती करकचून डांबून ठेवायचं
त्यांनी आम्हाला
बाहेर तारांचं कुंपण
आत निर्दयी भिंती
सोबत जबरीची सक्तमजुरी
नुस्तं सडत जाणं
नुस्तं कुजत जाणं
आमचीच आम्हाला यायला लागली आहे किळस
आम्ही खायला उठलोत स्वत:ला
किती वेळ दीर्घात नजर गुंतवायची
किती वेळ उभ रहायचं मेंदूच्या एकाच पायांवर

वादळ
वादळ । वादळ
आम्हाला व्हायचं होतं स्वार त्यावर
कळवा घालायचा होता त्याला
गुलामांच्या देवतेला करायचं होतं उघडंनागडं
काढायची होती तिची धिंड
उचंबळून मामील व्हायचं होतं आम्हाला
बलिदानाच्या उत्सवात
आमचा निर्वंश करायला निघालेल्या
गद्दार गांडू सूर्य
करायचं होतं त्याला लाचार अपमानित
डांबायचं होतं त्याला पाळीव जनावरासारखं दावणीला
सर्कशीतल्या वाघासारखं
नाचवायचं होतं त्याला हंटरच्या इशाऱ्यावर

आवळलेल्या मुठीतून
घरंगळत विस्कळत रहातात दुवे
सहजगत्या आवळले जातात फास
घोडे कितीही उधळले
तरी ते चक्राकारच फिरतात अजून
हा आवाज युद्धखोर टापांचा
की
भोपळ्यातल्या थेरडीच्या पावलांचा
निर्भर्त्सना आधी केलीच आहे तुम्ही
मग म्हणाना म्हणा
चल गं भोपळ्या टुणुक टुणुक
विश्रब्ध युद्धभूमी कैक पिढ्यांचं दर्द
शब्दांनी हरवून जायला हवंय
फक्त वेड्यांच्या जत्रेत
वेड्यांच्या,
हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस.

2836
23002

नाम्या, आज सकाळीच आलो / ग्वा
होतंस / तिथं मराठीतले मी, चंद्रशेखर
हा सेमिनार फारच चांगला झाला / हि
अनुपस्थितीत वाचला गेला / प्रचंड चर्च
१२-१३ कवींच्या सुमारे ५० कवितांचे
केले होते / एकूण फक्त तुझ्या व
त्यातही पुन्हा खास तुझ्याच / ६ क
पिठा'तून ५-६ आणखी कविता आ
translations / हिंदीवाले प्रचंड खूष
अर्थात् ह्यात माझ्या वाचण्याच्या पद्धतीचाही
म्हणून लोकांना तुझ्याच interest
मध्यप्रदेश शासनाच्या साहित्य परिषदे
एक परिचयात्मक नोट मी छापती
नंतर या हिंदी अनुवादांवरून
तसं लोकांनी मला विचारलंय

या सर्व गोष्टींना तुझी परवा
कविता' नावाचं संकलनही मी
अमरशेखची परवानगी
एवढंच तूर्त ! लिही !

चंद्रकांत पाटील १/१२

रहून तसाच पुण्याला शाम्याकडे गेलो होतो / ग्वाल्हेरला तू यायला हवं
जहागिरदार व दया पवार एवढेच / बाकी तू, राजा + दिलीप + संतोष नेरूरकर/
दिले फार चांगले लोक होते / मी व शेखर ने पेपर्स वाचले, दिलीपच्या त्यांच्या
झाली / लोक खूप व्यवस्थित चर्चा करीत / तीन्ही दिवस मिळून मी
ललित) अनुवाद मी केले होते ते वाचले / तुझ्या ६ कवितांचे अनुवाद
प्रकाश जाधवच्या कवितांनाच हिंदी साहित्यिकांनी प्रचंड डोक्यावर घेतले/
यांच्याव्यतिरिक्त तुझ्या आणखी कविता मला वाचायला लागल्या / मी ओळ
प्रकाशित व नंतर नालंदा हिंदीत अनुवादून वाचल्या / this was
संबंध Seminar वर नामदेव ढसाळच (आत्मस्तुतीचा दोष पत्करूनही
थोडासा वाटा होताच !) हे या सेमिनारमुळे एकदम National event
!!

च्या "समकालीन" या हिंदी मासिकात तुझ्या १० कविता आणि
/ म्हणजे १६ ही अनुवाद कवितांचे / ते मुद्दाम एकत्र पेपर देतोय /
च्या उर्दू, आसामी इत्यादी अनुवादही मी करून घेतोय, म्हणून
आहे /

आहे असे मी गृहित धरतोय / दुसरे : मराठी दलित
काढली आहे हिंदीत / त्यासाठीही तुझी व मल्लिका
व / मल्लिकाच्या अलिकडच्या काही ५-६ कविता पाठव

एप्रिल १९८२ / औरंगाबाद 431 001